या कोटापासून गंधकुटीच्या पहिल्या खालच्या भागाच्या सिंहासनापर्यंत लांभ अशा सोळा भिंती आहेत. त्या भिंतीही स्फटीकाच्या रचलेल्या आहेत व त्यांची कांती फारच देदीप्यमान आहे. पहिल्या

**स्फटिकाच्या सोळा भिंती**

सिंहासनाच्या खाल्या भागातून स्पटिककोटापर्यंत असलेल्या सोळा भिंती इतक्या निर्मल आहेत की, त्या अतिशय स्वच्छ असल्यामुळे आपल्या डोळ्याला दिसत नाहीत. चोहोंकडे आकाशच पसरले आहे असे वाटते. त्या भिंतीला हाताचा स्पर्श करावा तेव्हाच तिचे ज्ञान व्हावयाचे. त्या ठिकाणची भूमी ही भगवंताच्या ज्ञानविद्येप्रमाणे निर्मल व सर्व वस्तूंचे प्रतिबिंब दाखविणारी आहे. या सोळा भिंतीच्या मध्यभागी सोळा दारे असून, त्यातून चार मोठे रस्ते (महावीथी) गेले आहेत. त्या महावीथीच्या मध्यभागी बारा सभास्थाने आहेत. स्फटिकमण्याच्या अतिशय निर्मल भिंतीमुळे सभास्थान व भिंती यांचा भेद दिसून येत नाही. त्या भिंतीवर रत्नाचेच सोळा खांब असलेला स्फटिकमण्याचा अतिशय उंच असा श्रीमंडप आहे. तो एक योजन लांबरुंद असून गोल व शोभायमान आहे. त्या मंडपात सुरासुर-मनुष्यादिकांना वंद्य श्रीपरमेश्वर विराजमान आहेत. म्हणून त्याला श्रीमंडप नांव यथार्थ आहे. तो मंडप स्फटिकमण्याचा असल्यामुळे त्यातून आकाशाचा सर्व भाग दिसून येतो. त्या मंडपाने त्रिजगातील लोकसमूहाला निर्बाध स्थान दिल्यामुळे मोठे वैभव संपादन केले आहे. त्या मंडपावर गुह्यकदेवांनी पुष्पांच्या माला लटकाविल्या आहेत. मंडपाच्या मध्यभागी त्या सोडलेल्या असल्याने देवमनुष्यांना त्या माला नसून तो तारासमूह असावा अशी शंका उत्पन्न होत आहे. एक योजन प्रमाण त्या श्रीमंडपात देव, मनुष्य , परस्परांना अडथळा न आणता आनंदाने बसतात.

त्या मंडपाच्या मध्यभागी एक वैडूर्यमण्याचे (वैडूर्यमणि हा मोराच्या कंठाच्या वर्णासारखा निळा असतो) आठ धनुष्य उंच सिंहासन आहे. त्याला सोळा कोन आहेत. प्रत्येक कोनात चढण्याकरिता सोळा

**भागातील सिंहासन**

पायऱ्या आहेत. या पहिल्या सिंहासनाच्या चाहोबाजूला चार महावीथी (रस्ते) मध्य एकेक कोस रुंद व धूलिशाल कोटापासून थेट या सिंहासनापर्यंत लांब गेलेले वैडूर्य आहेत. सोळा पायऱ्या चढून पहिल्या सिंहासनावर जावे लागते. नंतर देवमनुष्यांना आपापल्या स्थानी जाऊन बसण्याकरिता पुन:सोळा पायऱ्या उतरुन आपल्या कोट्याकडे जावे लागते. पहिल्या पिठाभोवती आठ मंगलद्रव्ये ठेवून त्याला शोभा आणली आहे. त्या पीठावर यक्षांनी आपल्या डोक्यावर अतिशय उंच असे चतुर्मुख धर्मचक्र धारण केले आहे. त्या धर्मचक्राच्या एक हजार रत्नमयी आऱ्यांच्या प्रभेने जणू काय प्रथम पीठ हाच उदयाचल पर्वत असून त्यावर सूर्याचे प्रतिबिंब उदयाला आले आहे असा भास होतो. त्या प्रथम पीठावर दुसरे सोन्याचे पीठ आहे. ते सूर्यकांतीप्रमाणे सर्व आकाशाला प्रदीप करीत आहे. त्या दुसऱ्या पीठावर आठ ध्वजा आहेत. चक्र, हत्ती, वृषभ , कमल, वस्त्र, सिंह, गरुड व माला यांची चिन्हे असलेल्या आठ ध्वजा आहेत. बाऱ्याने

त्या हलत असून पापरुपी रजाला उडवून देत आहेत. त्या पीठांवर आपल्या रत्नकांतीने अंध:काराला दूर करणारे तिसरे रत्नांचे पीठ आहे. याप्रमाणे संपूर्ण रत्नमयी त्रिमेखलामय पीठाचे रुप धारण करुन भगवंताची उपासना करण्याकरिता जणूं सुमेरु पर्वतच आला आहे की काय असे वाटते.

आता समवसरणाचा विस्तार पहा . धूलिशाल कोटापासून खंदकापर्यंत गोल व्यास एक योजनाचा, पूर्व विहिरीच्या वेदीपर्यंत वलयव्यास एक योजन, अशोक वगैरे वनांचा वलयव्यास एक योजन, ध्वजेच्या तलभूचा व्यास एक योजन, कल्पवृक्षाच्या वनांचा वलयव्यास समवसरणाचा एक योजन, प्रासादपंक्तीचा वलयव्यास अर्ध योजन, एकूण एका दिशेला विस्तार साडेपाच योजन व्यास झाला. दोन्ही दिशांना अकरा योजन व्यास झाला. याशिवाय स्फटिक कोटात असलेल्या श्रीमंडपातील भूमीचा विस्तार एक योजनाचा मिळून बारा योजन समवसरणाच्या भूमीचा विस्तार आहे. श्रीमंडपातील स्फटिकमय कोटापासून गंधकुटीच्या खालच्या सिंहासनापर्यंत सभेची भूमी एक कोस, दोन्ही दिशांची मिळून दोन कोस, मध्यभागी तीन कटनी (थर) असलेले सिंहासन दोन कोस रुंदीचे, त्यात वरच्या तिसऱ्या पीठाची रुंदी १००० धनुष्य, दुसऱ्या पीठाची ७५० धनुष्य , एका बाजूला, दोहोबाजूची मिळून रुंदी १५०० धनुष्य व तिसऱ्या पीठाची एक बाजूची ७५० धनुष्य व दोन्ही बाजूंची मिळून १५०० धनुष्य आहे व मधला विस्तार एक योजन आहे. पहिले सिंहासन जमिनी पासून आठ धनुष्य उंच असून त्यावर चार धनुष्य उंचीचे दुसरे सिंहासन, त्यावर चार धनुष्य उंचीचे दुसरे सिंहासन, त्यावर चार धनुष्य उंचीचे तिसरे सिंहासन आहे. बाजूला चोहोबाजूनी एक योजना रुंदीचा मोठा रस्ता आहे. त्यांच्या दोन बाजूच्या भिंती पहिल्या सिंहासनाच्या उंची इतक्या आहेत. त्या भिंतीची जाडी उंचीच्या आठव्या भागाइतकी म्हणजे एक धनुष्याची आहे. बारा सभांच्या बारा भिंतीही आठ धनुष्य उंचीच्या व एक धनुष् रूंदीच्या आहेत. तिसऱ्या संहासनावर अनेक प्रकारच्या रत्नांचे ढीग पडलेले असल्याने त्यातून इंद्रधनुष्याची शोभा उत्पन्न होत आहे. तेथेच इंद्रांनी अनेक रंगाची पुष्पे टाकून अपूर्व शोभा आणिली आहे एक हजार धनुष्य प्रमाणाच्या त्या तिसऱ्या गोल सिंहासनावर सहाशे धनुष्ये लांबरूंद चौकोनी रत्नखचित गंधकुटी कुबेराने बनविली आहे. ती रुंदीहून अधिक उंच असून तिचे रचनेचप्रमाण उत्तम सधलेल आहे. त्याि‍य सभोवती उंच कोट असून अनेक प्रकारच्या रत्नप्रभेने आकाशाला शोबिवणरे शिखर आहे. मोठमोठ्या वाटोळ्या पाणीदार मोत्याच्या झालरी चोहोंकडे लाविलेल्या आहेत. मधून मधून कोठे रत्नाच्या झालरी लटकविलेल्या दिसन यतात. चोहों बाजूंनी भरजरीचे, उंची वस्त्राचे रत्नजिडत पडदे सोडले आहेत. कल्पवृक्षाच्या सुगंधित फुलांच्या माळा चोहों बाजूंनी लाविल्या आहेत जगातील सर्व सुगंधी पदार्थ, फुले धूम, वगैरे पदार्थाहून अधिक अशा जिनेश्वराचय अंगाचय सुगंधाने दाही दिशा भरू न गेल्य आहेत व म्हणून हिला गंधकुटी असे नांव अहा.े ही गंधकुट म्हणज शोभेची व सुगंधाची त्रैलोक्यातील शेवटची मर्यादा आहे. याहून उत्कृष्ट पदार्थ दुसरा नाही. सहाशे धनुष्य प्रमणाच्या चकोनी गंधकुटीच्या मध्यभागी एक यगजन उंचचीचे एक सिंहासन आहे. त्याची कांती व सौंदर्य अवर्णनीय आहे. त्या सिहांसनावर चार अंगुळे अधर सिंहसनाला स्पर्श न करत जिनेंद्र भगवान विरजमान आहेत. त्यांना इंद्रि देव परमभकतन संष्टांग नमस्कार करू न पूजन स्तवन करतात. त्या द्वादशयोजन सभेत देव हेच कोणी मेघ, हे कल्पवृङांच्या पुरष्परू पाने वृष्टी करील आहेत.

एक योजन प्रमाणाच्या श्रीमंडपावर रत्नांचा अशोकवृक्षा चौहों बाजूंनी पसरलेला आहे. त्या अशोकवृक्षाला मरकतमण्यांची हिरवीगार पाने व नाना प्रकारच्या रत्नांची फुले आहेत. वाऱ्यांने हळूहळू हालणाऱ्या त्या वृक्षाच्या शाखा पाहून जणू त्या नृत्य करीत आहेत असा भास होतो. मदोन्मत्त कोकिलांचा भ्रमरांचा शब्द जणू जिनेंद्राचे गुणस्तवन करीतआहे. कल्पवृक्षा आपल्या एक योजन प्रामाणाच्या शाखांनी संपूर्ण जीवांचे जणू दु:ख नाहसे करीत आहे. दाही दिशा त्या वृक्षाच्या डहाळ्यांनी आच्छादिल्या आहेत. त्या वृक्षांचे बुंधे हिऱ्याचे असून रत्नांचे फुले त्यास आलेली आहेत. दैदीप्यमान छत्रयांनी आपल्या निर्मलतेने सूर्यचंद्राच्या प्रभेचा तिरस्कार करून त्रैलोक्यातील अद्भूत पदार्थांच्या प्रभेला किले आहे. त्या छत्राला मोत्याच्या लहरी लावलेल्या आहेत. ते छत्र जणू त्रैलोख्याच्या आनंद देणारा हर्ष आहे, अथवा मोहाचा नाश कल्यामुळे उत्पन्न झालेला प्रभूच्या यशांचा समूह आहे अशी कल्पना उत्पन्न करीत आहेत. जिनेंद्राच्या बाजूला उभे राहून यक्ष ६४ चवऱ्या वारीत आहेत त्या चवऱ्या जणू क्षीरसमुद्रातील लाटांनी पंक्ती किंवा अमृताचे खंड किंवा चंद्राच्या किरणांचे समूहच आहेत की काय असा भास उत्पन्न करीत आहेत. अथवा चामराचे रूप धारण करून भगवंताची सेवा करण्यात करिता आहेत. अथवा चामराचे रूप धारण करून भगवंताची सेवा करण्यात करि गंगानदीचे आली आहे अथवा ती जिनेश्वराच्या अंगाची कांतीच आहे अथवा क्षीरसमुद्राच्या पेसांची पंक्ती वाऱ्याने हालत आहे, अथवा आकाशातून खाली येणाऱ्या हंसाची पंक्ती आहे, अथवा प्रभूचे निर्मल यश जणू चोहो दिशांना पसरले आहे असे वाटते. येत्या समवसरणात वाजत असलेले देवदुदुंभी पाहून आकाशात कोणी मेघच आले असावेत अशी शंका उत्पन्न होत आहे व ते आपल्या मृतासारख्या मधुर शब्दांनी कानाला तृप्त करीत आहेत. देवलोकातील अनेक जातीचे वाद्ये अनेक प्रकारच्या ध्वनीने सर्व दिशा दणाणून टाकीत असता मेघाची गर्जना जणू सर्व लोकात होत असावी असा भास उतपन्न होत आहे. अथवा भगवंतांनी मोहाला जिंकले त्याचा हा विजयध्यानी असावा असे वाटून सर्व लोकांची अंत:करणे आनंदाने भरून येत आहेत. जिनेश्वराच्या शरीराच्या अद्भुत शोभेने सर्व समवसरण व्यापून गेले आहे व ती प्रभा पहून सुर, असुर मनुष्य, इंद्र या सर्वांना अतिशय आश्चर्य उत्पन्न होत आहे. ज्या प्रभेने सूर्याच्या तेजाला लोपून टाकले आहे. ती प्रभा कल्पवासी कोट्यावधी देवाच्या प्रभेला आच्छादून टाकीत असता तिची सर्व जगात ख्यात व्हावी व तिला अप्रतिम उत्कृष्टता प्राप्त व्हावी यात आश्चर्य कसले( जिनेश्वराच्या देहरूपी अमृतसमुद्रामध्ये देव, दावन, मनुष्य आपापले सात जन्म पाहात आहेत. चंद्राची कांती थंडी उत्पन्न करते, सूर्याची कांती संताप देते, पण जिनदेवाचयदेहाचय कांतीने जडता नाहीशी होऊन संताप न होता ज्ञानाचा प्रकश होतो व अद्वितीय सुखाची प्राप्त होते. भगवंताच्या मुखकमलापासून मेघगर्जनेप्रमाणे दिव्यध्वनी प्रगट होत असतो तो बवय जीवांच्या अतं:करणात वसत असलेला मोहांधकार सूर्यासारखा दूर करून अनेकान्तस्वरूपी पदार्थाच प्रकाश करतो. याशिवाय त्या वाणीतला विशेष म्हणजे, ती एका रुपाने भगवंताच्य मुखावाट निघून सर्व प्रकारचया मनुष्यांना व पशूंना त्यांच्या स्वभाषेसारखी बनून अंत:करणात प्रवेश कत हा होय. तिच अंत:करणात प्रवेश होताच विपरीत ज्ञान नाहीसे होऊन यथार्थ तत्तवज्ञानाचा प्रकश पडतो. जसे पाण्याचा प्रवाह एकस्वरूपाचा असून तो अनेक प्रकारचय वृक्षांच्या मुळाशी पोहोचला असता अनेक प्रकरच्या फलांनी उत्पन्न करतो, तसे सर्वज्ञाचा ध्वनीही अनेक श्रोत्यांचय कर्णपुटात जऊन जसजशी

पात्रता असेल तदनुरूप अनेक फल घेऊन फलीभूत होतो. कित्येक या ध्यानीत नाना भाषी स्वभाव पाहून हा देवकृत गुम असावा अस म्हणतत, परंतु ते योग्य नाही. कारण दिव्यध्वनी अक्षरयुक्त आहे. अक्षरसमूहाशिवाय अक्षरज्ञान कसे होईल( असो. याप्रमाणे आठ प्रातिहार्यांच्या विभूतीने युक्त गंधकुटीवर अनंत दर्शन, अनंतज्ञान, अनंतवीर्य, अनंतसुखाला धारण करणारे पूर्व दिशोन्मुख व उततर दिशोन्मुख भगवान् अरिहंत परमष्ठी विराजमान आहेत.

बरा सभेची रचना

गंधकुटीच्या (प्रदक्षिणारूप) पहिल्या सभेत गणधर व मुनीश्वर बसतात दुसऱ्या सभेत कल्पवासी देवांच्या स्त्रि( तिसऱ्या सभेत (गणिनीयुक्त) अर्जिका व मनुष्य स्त्रिया( चौथ्या सभेत चक्रवर्ती व मनुष्य, पाचव्या सभेत ज्योतिष्क देवांच्या स्त्रिया, सहाव्या सभेत व्यंतरदेवांच्या स्त्रियाछ सातव्या सेभेत भवनवासी देवी( आठव्या सभेत भवनवासी देव( नवनव्या सेभेत व्यंतरदेव( दहाव्या सभेत ज्योतिष्क देव( अकराव्या सभेत कल्पवासी देव आणि बाराव्या सभेत तिर्यंच याप्रमाणे बारा सभातील सर्व जीव जिनेंद्राच्या भक्तिरसाने नम्र होऊन उपदेशरूप धर्मामृताचे पान करतात. भगवंतांनी घातिकर्माचा नाश केल्यामुळे त्यांना क्षुधा, तृषा, जन्म, मरण, जरा, रोग, शोक, भय, विस्मय, अरति,चिंता, स्वेद, खेद, मद, मोह, निद्रा, राग आणि व्देष, या अठरा दोषांचा अभाव झालेला आहे. ज्या अठरा दोषांनी संसारात यच्चयावत प्राण्यांना व्यापून टाकले आहे, त्या दोषांचा नाश झाल्यामुळे अनंतसुखरूप परमात्मा, परमपूज्य जिनेश्वर अनंतगुणांनी कोट्यावधी सूर्यासारखे प्रकाशणारे, अनेक अतिशयांनी युक्त, अनंज्ञान, अनंतदर्शन, अनंतवीर्य व अनंतसुख धारण करून विराजमान आहेत. याप्रमाणे अरहंताच्या स्वरूपाचे ध्यान करणे याला रूपस्थध्यान म्हणतात.

जो पुरुष स्वत: वीतराग बनून वीतराग परमेष्ठीचे स्मरण करतो तो कर्मबंधनापासून मुक्त होतो. पण जो स्वत: रागद्वे,युक्त बनून सरागी परमेश्वराच्या स्वरूपाला अवलंबून त्याचे ध्यान करतो अथवा मंत्र, मंडल, मुद्रा वगारे अनेक प्रयोगांनी ध्यान करू इच्छितो, त्याला

एकाग्रतेचे सामर्थ्य

आत्म्याची एकाग्रता केल्यामुळे फार मोठे सामर्थ्य प्राप्त होते. तो एक क्षणात सुरु, असुर मनुष्याच्या समूहाला क्षोभित करून टाकतो. विद्यानुवादामध्ये अनेक विद्या मंत्र, मंडल वगेरेच्या अक्षरांची आम्याशी एकाग्रता झाल्याने त्या अक्षरात तशी शक्ती उत्पन्न होते. त्यापासून अनेक अद्भुत चमत्कार करून दाखवितात येतात. पदार्थांचा आत्म्याशी संयोग होऊन एकाग्रता झाली असता, त्या संयोगात असे अलौकिक सामर्थ्य उत्पन्न होत असते. हा वस्तुस्ववभाव असल्यामुळे तो कोणी दूर करून शकत नाही.

काही पुद्गल परमाणूंचा संयोग झाल असता कित्येक पदार्थात विषशक्ती उत्पन्न होते व कित्येक पदार्थात अमृतशक्ती उत्पन्नहोते, कित्येक पदार्थात शरीराचा स्पर्श होतातच विकार दूर करण्याची शक्ती उत्पन्न होते, कित्येक पदार्थाचा शरीराचा स्पर्श होताच विकार दूर करण्याची शक्ती

वचनशक्तीचे

उत्पन्न होते, कित्येक पदार्थ भक्षण केले असता प्राण हरण केले जातात.

सामर्थ्य कित्येक पदार्थांच्या भक्षणाने अमृतासारखी जीवनशक्ती प्राप्त होते. याचप्रमाणे वचनामध्येही अचिंत्य सामर्थ्य आहे, त्यायोगाने आत्म्यात क्रोधादिक विकार उत्पन्न होतात अथवा त्या भाषणाचे श्रवण करण्यापासून आजन्म कषाय नाहीसे होतात. मंत्रोच्चारणापासून विषबाधा नाहीशी अथवा त्या भाषणाचे श्रवण करण्यापासून आजन्म कषाय नाहीसे होतात. मंत्रोच्चारणापासून विषबाधा नाहीशी होते, अथवा उत्पन्न करता येते.

याप्रमाणे मनाच्या एकाग्रतेने ध्यान उत्पन्न होते. त्यातही अकल्पित सामर्थ्य आहे. स्वर्ग मोक्षाला कारण ध्यानच आहे. असंख्यात ध्याने अशी आहेत की ती मौजेकरिता केली जातात पण

इतर यापासून इष्ट फलप्राप्ती न होता कुमार्ग-प्रवृत्तीची वृध्दी होते. अतएव ती कुध्यान करू नका. सर्व दुर्गतीचा कारणे बनून कुध्याने म्हणविली जातात. आत्मा हा स्वभावत:

अनंतशक्ती धारण करणारा आहे. त्याला जसेजसे बाह्यनिमित्त प्राप्त होईल तसे तसे त्यात परिणमन होत जाते. म्हणून जिनधर्मानुयायांनी खोटे ध्यान, कुंमंत्र, मंडल, साधनादि क्रिया करण्याचे स्वप्नात देखील मनात आमू नये. कुध्यानाच्या प्रभावाने यथार्थ मार्गापासून भ्रष्ट व्हावे लागते. एकदा कुबुध्दी प्राप्त झाली की सद्बुध्दीचा नाश होतो. मग अनेक जन्म गेले तरी निर्मलबुध्दी प्राप्त होत नाही व मिथ्यामार्ग जो गळ्यात अडकला तो सुटत नाही. सन्मार्गापासून च्युत झाले असता असंख्यात जन्मात सम्यक्बुध्दी प्राप्त होत नाही. जिनसिध्दांताचा निर्मल उपदेश, अंत:करणात विपरीत बुध्दी जागृत असल्यामुळे लागू पडत नाही. खोटे मंत्र, तंत्र वगैरे सर्व आत्म्याचा नाश करणआरे असून रागद्वेषाची वृध्दी करणारे आहेत. गृहीतमिथ्यात्वी जीव कुध्यान, खोटे मंत्र, मंडल, मुद्रा, यंत्र, तंत्रप्रयोग याही करून रागी, द्वेषी, कामी क्रोधी अशा व्यंतरवासी, भवनवासी, ज्योतिषवासी, देव-देवी, यक्षिणी वगैरेची आराधना करीत असतात. संसारात विषयभोग प्राप्त व्हावे, धन मिळावे व अभिमान वाढावा वगैरे कषायांच्या खोट्या आशा पूर्ण होण्याकरिता आर्तध्याना करून पूर्वी संपादन केलेले सर्व पुण्य नाहीसे करतात.

विषय कषायाची इच्छा हीच दुर्गतीला पोहोचविणारी आहे. पुन: त्यात खोट्या विद्या, खोटे मंत्र वगैरेचे ध्यान करण्याची भर पडली म्हणजे आत्म्यामध्ये मिथ्यात्व कषआयांचे दृढ आरोपण होते,

यापासून निगोदामध्ये अनंतकाल भ्रमण करावे लागते. बुध्दिमान पुरुषाची असे

खोट्या मंत्रतंत्राच्या ध्यान, चिंतन व आचरण करावे की त्यापासून जीव कर्मबंधनापासून मुक्त नादी लागू नका. होईल. जे शांतचित्त, मंदकषायी, निर्वाछक, संतोषी व मोक्षमार्गावलंबी आहेत,

त्यांना विद्यामंत्रतंत्रमंडलादिकांच्या साधनाशिवाय स्वयमेव अनेक ऋध्दी वस्तुफलप्राप्ती होच नाही, पण मंत्रतंत्राचे साधन करीत असूनही अनेक संकटे प्राप्त होतात. याकरिता वीतरागधर्मावर भरंवसा असणाऱ्या लोकांनी कधीही खोट्या मंत्रतंत्रादिकांचा विचार मनात आणू नये व त्यांची प्रशंसा करू नये.

शरीरादि नोकर्म व ज्ञानावरणादि अष्टकर्म-रहित, चैतन्य स्वरूपात्मक, निजानंदमय, शुध्द, अमूर्त, अविनाशी, अजन्मा, स्पर्शरसगंधवर्णादि पुद्गल-विकार-रहित, अनंज्ञान, अनंतदर्शन, अनंतसुख व अनंतशक्ति-चतुष्टय युक्त, स्वस्वभआवाधीन निराकुल, अतीन्द्रिय, सिध्द व कृतकृत्य अशा आत्म्याच्या स्वभावाचे मनात चिंतन करणे हे रूपातीत ध्यान आहे. यद्यपि चित्ताची एकाग्रता करणे याला ध्यान म्हटले आहे. तथापि सिध्दपमेष्टीचे गुण व स्वरूप ध्यानामध्ये अवलोकून अनन्यशरण होऊन तत्स्वरुपात लीन होऊन जाणे हे देखील धर्मध्यान आहे. सिध्दपरमेष्टीचे गुण आपल्या स्वभावात उतरविणे अवि तत्स्वरूपी आपण आहोत अशी भावना करणे हेच परमात्मिचंतनात लीन होणे आहे. परमात्म्यात व आपल्यात गुणदृष्टीने समानता आहे. आमचे गुण कर्मांनी आच्छादिलेले आहेत. कर्मांचा अभाव झाल्याने सिध्दपरमेष्टीचे गुण प्रगट झाले आहेत. याप्रमाणे ध्यान करण्याचा निरंतर अभ्यास ठेवल्याने आत्म्यात पूर्ण निश्चलता प्राप्त होते व सिध्दांचा स्वभाव त्याला प्रत्येक्षाओभासू लागतो. अशी एकतानता करणाऱ्यालाच रूपातीत ध्यान होते.शुक्लध्यान

यापुढे शुक्लध्यानाचा विचार करू , जरी शुक्लध्यानात होणाऱ्या निर्मल परिणामांचा अंश देखील आपणास प्रत्येक्षा होत नाही, तरी शास्त्रानुसार त्याचे थोड्यात स्वरूप वर्णन करमअयाचे योजिले आहे.

**शुक्लध्यानाचे चार प्रकार**

शुक्लध्यानाचे चार प्रकार आहेत. त्यातून पहिली दोन ध्याने चौदापूर्व व द्वादशांग वाणीला धारण करणाऱ्या मुनीला होतात व दुसरी दोन ध्याने केवली भगवंताला होतात. पृथक्त्व वितर्कवीचार, एकत्ववितर्कवीचार, सूक्ष्मक्रिया प्रतिपाति आणि व्युपरत क्रियानिवर्ति अशी ती चार होत. यातून पहिले शुक्लध्यान हे मनवचनकायेचे तिन्ही योग असताना होणारे आहे. दुसरे फक्त एकच योग असताना होते. तिसरे ध्यान एक काययोग असताना होते व चौथे ध्यान अयोगी केवलींना होते. पहिले शुक्लध्यान सवितर्क म्हणजे श्रुतज्ञानाचे शब्द व अर्थ यांना अवलंबून होत असते. त्यात सवितर्कसवीचार म्हणजे अर्थाची पलटणी, शब्दाची पलटणी, योगाची पलटणी होत असते. म्हणून त्याला सवितर्कसवीचार म्हटले आहे. याप्रमाणे अनेक शब्द व अर्थ योगांची पलटणी ज्यात होते त्याला पहिले पृथक्त्ववितर्कवीचार शुक्लध्यान म्हणतात.

दुसरे शुक्लध्यान श्रुतांचा एक शब्द, एक अर्थ व एक योग याला अवलंबून होते. एक वेळ जो अर्थ अथवा शब्द अवलंबिला त्यात पलटणी होत नाही. म्हणून याला एकत्ववितर्कवीचार म्हणतात. यात वितर्क हे श्रुतज्ञानाला व विचार हे अर्थाच्या, व्यंजनाच्या व योगाच्या संक्रान्तीला म्हमेजे पलटणीला म्हटले आहे. अर्थ म्हणजे ध्यान करमण्यायोग्य पदार्थ अर्थात् ध्ये, म्हणजेद्रव्य वा पर्याय हे होते. व्यंजन म्हणजे वचन, योग म्हणजे मनवचनकायेची हलनचलन क्रिया, संक्रान्ति म्हणे परिवर्तन, द्रव्याला सोडून पर्यायाचा विचार करणे, पर्याय सोडून द्रव्याचा विचार करणे याला अर्थ संक्रान्ति म्हणतात. श्रुताच्या एका शब्दाला ग्रहण करून पुन: श्रुताच्या दुसऱ्या शब्दाला ग्रहण करणे, दुसरा शब्द सोडून तिसऱ्या शब्दाचे अवलंबन करणे ही व्यंजनसंक्रान्ति होय. याचप्रमाणे काय-योगाशिवाय इतर योग ग्रहण करणे ही योगसंक्रंन्ति आहे. अशा प्रकारचे परिवर्तन होणे याला वीचार म्हणावयाचे. याप्रमाणे सामान्य विशेष

प्रकाराचे सांगितलेले चार प्रकारेच शुक्लध्यान संसाराचा पूर्णपणे अबाव होण्यासाठी मुनीश्वरांना होत असते.

ध्यान करण्याच्या प्रारंभी पुढील साधन सामुग्रीची आवश्यकता आहे. ज्यावेळी उत्तम ती शरीरांचे संहनन असेल व परीषहांची पीडा सहन करण्याचे आत्म्यात सामर्थ्य उत्पन्न होईल त्याचवेळी ध्यान करणअयास प्रारंभ करावा. पर्वत, नदी गुहा, दरी, वृक्षाची पोकळी, नदीचा तट, स्मशान, जुना बगीचा,रिकामे घर यातून कोणतेही स्थान असावे. त्यात साप, पशुपक्षी व मनुष्य याचे वास्तव्य नसावे. तसेच आगन्तुक उत्पन्न होणारे जीव, किडे, मुंगळे, विंचू, माशा, मधमाषा वगैरेचे उपद्रव नसावा. त्या जागी फार उष्मा, अति थंडी, सोसाट्याचा वारा, जोराचा पाऊस वगैरे होण्याची भीती नसावी. कोणत्याही प्रकारेच बाह्यत: शरीराला व अभ्यंतर मनाला विक्षेप उत्पन्न होणारी कारणे तेथे उपलब्द नसावीत. अशी शुध्द, पवित्र व अनुकूल जागा पाहून तेथे उपलब्ध जमिनीवर पल्यंकासन घालून सम, सरळ अशा शरीररूपी काठाली निश्चल करावे. आपल्या मांडीवर डाव्या हातावर उजव हात सरळ ठेवावे. परिणामात शांती व गांभीर्य आणून मुखावर प्रसन्नता ठेवावी. पापणी न लववविता सौम्यगदृष्टी ठेवून निद्रा, आलस्य, काम राग, रति, अरति, शोक, हास्य, भय, द्वेष, ग्लानी, नाहीशी करावी. श्वासोच्छवास हळूहळू करावा. हाच परिकर म्हणजे साधनसामग्री ध्यान करू इच्छिणाऱ्या साधूजवळ असावी. नंतर त्याने नाभीच्या वरल्याभागी, हृदयात, मस्तकात अथवा दुसर्या कोणत्यही जागी आपल्या मनाची प्रवृत्ती पूर्वी अभ्यास असेल तदनुरूप लावावी व मोक्षा म्हणजे कर्मबंधनरहित अवस्था प्राप्त होणाऱ्या इच्छेने प्रशस्त ध्यान करावे. ध्यान करताना मन एकाग्र करावे. राग, द्वेष मोहांचा उद्रेक होऊ देऊ नये. शरीराची हलनचलन क्रिया मुळीच होऊ देऊ नये. बंद श्वासोच्छवास करून मनाला निश्चरल करावे. क्षमा धारणा करावी. बाह्य अभ्यंतर द्रव्यपर्यायाचे ध्यान करीत श्रुतज्ञानाचे सामर्थ्य अचिंत्य आहे, असे मान आणावे. अर्थ, व्यंजल, काय, वचन, यांची वेगवेगळी परिणती जाणून मनात पृथत्कववितर्कवीचार शुक्तध्यानाचे चिंतन कराव. जसे एखाद्या मनुष्याला पूर्ण शक्ती असूनही उत्साह नसल्यने तो हाती धार असलेले शस्त्र न घेता बोथट शस्त्रांनीच पुष्कळ दिवसांनी सचिक्कण लाकडाल फोडून टाकतो त्याप्रमाणे आठव्य, नवव्य व दहाव्या गुणस्थानवर्ती सधूला संज्वलन कषायाचा उदय असल्याने परिणामात परिपूर्ण शकत व उत्साह राहात नाही. पण सूक्षम कषायांच्या उदयाने त्याच्यापरिणामात जो धक्का बसतो, त्यामुळे त्याला आपल्या परिणामात निश्चलतेने रहत येत नाही. तो मोहनीय कर्मच्या संपूर्ण उयाचा नाश न झाल्यामुळे हळूहळू करणरूप पिरणामांच्या समर्थ्याने मोहनीय कर्मच्या प्रकृतीचा उपशम अथवा क्षाय करीत असतो. अशा स्थितत तयाा हे पृथक्त्वितर्कवीचार शुक्तध्यान घडते. त्यापुढे वरचेवर कषायातील शक्ती नाहीशी होत जोऊन त यगापसन यगंतर, शब्दापासून शब्दांर व अर्थाहून अर्थंतर करीत करीत ध्यनाच्य प्रभावाने संपूर्ण मोहकर्माचा नाश करून ध्यान योग आकुंटित करून घेतो. याचमार्गाने संपूर्ण मोहकर्माचा नाश करू इच्छिणाऱ्या अनंतपटीने शुद्ध अशा योगाच्या आश्रयाने ज्ञानावरणाला सहाय होणाऱ्या प्रकृतीचा प्रतिबंध करावा त्यंची स्थिती कमी करावी अथवा त्यंचाक्षाय करावा. श्रुतज्ञानाकडेच आपले लक्षा लावाले. अर्थसंक्राति, वंजनसंक्रांति, योगसंक्रांति होऊ न देता मन निश्चल करून कषाय क्षीण करावे.

वैडूर्यमण्याप्रमाणे निर्लेप होऊन धयान करावे म्हणजे पुन: त्यापासन च्युत होण्याची भीती नाही. याप्रमाणे ध्यान करणाऱ्यास एकत्ववितर्क ध्यान पडते.

या रीतीने म्हणजे एकत्ववितर्क शुक्लध्यानरूप अग्नीने ज्यांनी घातिकर्मरूपी इंधन नाहीसे करून केवलज्ञानरूप सूर्य प्रज्वलित केला आहे, ते मेघसमूहातून बाहेर पडलेल्या सूर्याप्रमाणए दैदीप्यमान असे भगवान तीर्थकर, केवलीअथवा त्रैलोक्याचे प्रभू होत ज्यांना इंद्रधरणेंद्र नमस्कार करतात ते अधिकात अधिक दोनशेकोटीपूर्व वर्षेपर्यंत विहार करतात. अंतमूहूर्त आयुष्य शेष राहिले असता व वेदनीय, नाम, गोत्र यांची मर्यादा आयुकर्माइतकीच असता, संपूर्ण मनावचनयोगाला व बादरकाययोगाला सोडून सूक्ष्म काययोगाचे अवलंबन करतात. अशा प्रकारेच मुनी`च सूक्ष्मीक्रिया प्रतितपाति ध्यानाला योग्य आहेत. अंतर्मुहूर्त आयुष्याची स्थिती असून, बाकी वेदनीय, नाम ग्रोत्राची अधिक स्थिती असेल तर ते सयोगी मुनीश्वर कर्माचा नाश करणअयाकरिता दंड, कपाट, प्रतर याक्रमाने लोकपूरण-समुदघात करून आपल्या आत्मप्रदेशाला चार समयात सर्व लोकाकाशात फैलवितात. दुसऱ्या चार समयात ते प्रदेश आकुंचित करून सर्व कर्माची स्थिती सारखी करून ठेवतात व पूर्वशरीर-प्रमणाकारर बनून सूक्ष्मक्रियाप्रतिपातिध्यान करू लागतात.

यानंतर समुच्छिन्नाक्रियानिवर्ति ध्यानाचा आरंभ करतात. समुच्छिन्न म्हणजे नाहीशी केली आहे. श्वसोच्छवासाची क्रिया व मनवचनकायेची क्रिया म्हणजे संपूर्ण प्रदेशाचा हलनचलनरूप व्यापार, अशा क्रियेला समुच्छिन्न क्रियानिवर्तिध्यान म्हणतात. या ध्यानामुळे संपूर्म बंधाची कारण, संपूर्ण आस्त्रवांचा निरोध व सर्व कर्मांचा नाश करण्याचे सामर्थ्य उत्पन्न होते. त्यामुळे अयोगीकेवलींना संसारातील दु:खाचा संयोग नाहीसे करणारे साक्षात् मोक्षाचे कारण यथाख्यात चारित्र व ज्ञानदर्शन उत्पन्न होते. ध्यानरूप अग्नीने कर्मलकलंक नाहीसा होतो. निर्मल सुवर्णाप्रमाणे आपल्या आत्म्याची शुध्दी करून अयोगकेवली मोक्ष प्राप्त करून घेतात. याप्रमाणे संक्षेपात शुकलध्यानाचे स्वरूप सांगून ध्यानतपाची भावना वर्णिली.

यापुढे अनेक भावना व समयसारादिक भावनांचे स्वरूप सांगावयास पाहिजे. परंतु नाशवंत शरीराचा भरंवसा वाटत नाही, म्हणून मूलसूत्रकारांनी वर्णिलेला ग्रंथ लवकर पुरा करणे योग्य आहे, असा विचाराने अधिक विवरण न करता मूळ ग्रंथाच्या विषयाकडे वळतो.

-----------

## ५ सल्लेखना अधिकार

येथपर्यंत श्रावकांची बारा व्रते सांगितली. पण शेवटी सल्लेखना केल्याशिवाय व्रताची सफलता नाही. बारा व्रतास एक देवळाची कल्पना केली तर त्यावर सल्लेखनेचे वर्ण हाच कोणी एक रत्नमयी कलश चढि वल्याशिवायत्या देवळाची शोभा नाही. एतएव सल्लेखनेचे स्वरू प व तीक वेहा करावी हे सांगतात -

### सल्लेखना

उपसर्गे दुर्भिक्षे जरसि रू जायां च नि:प्रतीकारे ।

धर्माय तनुविमोचनमाहुछ सल्लेखनामार्या: ।। १२२ ।।

अन्वयार्थ - (नि:प्रतीकारे) अनिवार्य, (उपसर्गे) उपसर्ग, (दुर्भिक्षे) दुष्काळ (जरसि) वृध्दापकाळ (च) आणि (रू जायं) रोग प्राप्त झाला असता (धर्माय) धर्मरक्षणार्थ (तनुविमोचनं) शरीराचा त्याग करणे याला (आर्या:) श्रेष्ठ मुनी (सल्लेखनां आहु:) सल्लेखना म्हणतात.

शरीरधारण व त्याचे रक्षण ही दोन्ही कार्ये धर्माकरिता करणे अवश्य आहे. धर्मपालन केले तरच नरजन्म, इंद्रिये व मन वगैरेची प्राप्ती होणे सफल समजले जाते. जेथे धर्माचा नाश होणार असे चिह्न दिसते व ज्ञान, श्रध्दान, चारित्र वगैरे निभणार नाही अशी खात्री होते तेथे धर्माचे रक्षण व्हावे म्हणून देहाचा त्याग करणे याला आचार्यांनी सल्लेखना म्हटले आहे. कोणी वूर्वजन्माचा वैरी, असुर पिशाचादिक देव येऊ पीडा देऊ लागला, दुष्ट, वैरी, भिल्ल, म्लेच्छ, सिंह, वाघ, हत्ती, साप वगैरे उपसर्ग देऊ लागले, अथवा प्राण नाश करणअयासारखा झंजावात सुटला अथवा दुधार पाऊस पडू लागला( शीत, उष्ण, अग्नी, पाषाण, पूर वगैरे गोष्टीपासून दु:ख प्राप्त झाले, कुटुंबातील माणसांच्या दुष्ट कृत्यामुळे अथवा आप्तस्नेह्यादिकांच्या कृत्यामुळे अथवा प्रबल मिथ्यात्वाच्या उदयामुळे अथवा उदरपोषणाच्या लोभामुळे चारित्रधर्माचा नाश होण्याचा संभव दिसू लागला( दुष्ट राजा, मंत्र वगैरे पीडा करू लागले तर या सर्व प्रसंगी सल्लेखना धारण करावी. याचप्रमाणे एखाद्या भयंकर निर्जन करण्यात दिशाभूल झाल्याने मार्ग सापडेना, दुष्काळामुळे अन्नपाणी मिळणे दुर्लभ झाले, सर्व शरीराला ग्रासून टाकणारे व कर्मनासिकादि इंद्रियांची शक्ती क्षीण करणारे म्हातारपण प्राप्त झाले असता सल्लेखना करावी. असाध्य रोग उत्पन्न झाला, सन्निपातासारखा भयंकर ज्वर अथवा अतिसार, श्वास खोकला झाला, वातिपत्ताचे प्राबल्या होऊन अग्नी मंद झाला, शक्ती कमी होऊन दिवसेंदिवस शरीरातील रक्त कमी होऊ लागले, उदरव्यथेसारखे जबरदस्त विकार उत्पन्न झाले, तर त्याप्रंसगी सल्लेखना करणे योग्य आहे. ही कारणे अवश्यमेव मरण उत्पन्न करणारी आहेत. म्हणून त्याप्रसंगी चार आराधनांचे चिंतन करू नशरीर, घरदार, कुटुंब वगैरे सर्वावरील प्रेम सोडावे, क्रमाक्रमाने आहारपाणी सोडीत शरीराचाही त्याग करावा. शरीर नाहीसे झाले

तरी आत्म्याचा ज्ञानदर्शनस्वभाव नाहीस होणार नाही अस प्रयत्न करावा. शरीर नाशवंत असलयने कोट्यवधी उपा केले व मत्र, तंत्रादिकांनी देव उपस्थित झाले तरी कोणीही याचे रक्षण करू शकणार नाही.आजपावेतो अनंतानंत देह धारण केले पण एका रत्नत्रयधर्माचे ग्रहण केले नाही., तयमुळेच एवढे भ्रमण करावे लागले आहे. हाच धर्म संसारपरिभ्रमणापासून रक्षण करणारा आहे. म्हणून परलोक प्राप्त होईपर्यंत तो मलिन न होता राहो असा पक्का निश्चय करून शरीरावरचे प्रेम सोडावे. यप्रमाणे सुज्ञ लोक समाधिमरण प्राप्त करून घेण्यासाठी सदैव प्रयतन करीत असतात.

## समधिमरणाचा महिमा

अंतक्रियाधिकरणं तपःफलं सकलदर्शिनः स्तुवते ।

तस्माद्यावद्विभवं समाधिमरणे प्रयतितव्यम् ।। १२३ ।।

अन्वयार्थ - (अंतक्रियाधिकरणं) अंतक्रिया म्हणजे संन्यासमरण हेच ज्याचा आदार आहे अशा प्रकारच्या (तपःफलं) तपाच्या फलाची (सकलदर्शिनः) सर्वज्ञदेव (स्तुवते) प्रशंसा करतात. तपश्चरण करणाऱ्याला जर तपाचे फल म्हमून शेवटी सन्यासमरम प्राप्त झाले नाही तर त्याचे तप करणे व्यर्थ आहे. (तस्मात्) म्हणून (यावद्विभवं) जेवढे सामर्थ्य असेल तितका प्रयत्न करून (समाधिमरणे) समाधिमरण प्राप्त होईल (प्रयतितव्यं) असा यत्न करणे योग्य आहे.

भावार्थ - व्रत, संयम तप करण्यापासून अनेक प्रकारचे फल जगात प्राप्त होते. तप करम्यापासून देवलोक प्रपात् होतो. मिथ्यादृष्टी जीव देखील तपश्चरणाच्या प्रभावाने नऊ ग्रैवेयाकापर्यंत अहमिंद्र होऊन जन्म घेतात. तयांना मोठ्या मोठ्या ऋध्दी व संपदा प्राप्त होता. तपश्चरणापासून चक्रवर्तित्व, नारायणपद, बलभद्रपद, राजेंद्रपद, वैभव, संपतती, निरोगता, बल वगैरे प्राप्त होतात.अखंड अशा सर्वांना दिपवून सोडणारे ऐश्वर्य, अतुल ऋद्दी व पुष्कळ परिवार हेही तपश्चरणाचेच फल आहे, पण शवटी समाधिमरण प्राप्त झाल्याशिवाय या सर्वांचा काहीही उपयग नाही. ही विभूती पूर्वी अनेक वेळा भोगलेली आहे. या विभूतीच्य नाद लागल्याने संसार-परिभ्रमण करण्याचे संपले नाही. तपश्चरण करन ज्याने शेवटी समाधिमरणिवधीने चार आराधनांना शरण जाऊन निर्भयतेने मरण साधले, तयालाच तपाचे खरे फळ प्राप्त झाले व त्याचीच सर्व दर्शी भगवंतांनी प्रशंसा केली ाहे. कोट्यावधी वर्षेपर्यंत तपश्रण करू नही अंतकाली ज्याचमरण बिघडले, त्यांचे तप प्रशंसा करण्यासारखे नाही. तप करण्यापासून देवलोक किंवा मनुष्यलोकातील संपदा प्राप्तहोईल. पण मरणसमयी आरधनेचे चिंतन ज्याला होत नाही त्याला संसारपिरभ्रमणच करावे लागेल. एखादय रपुरुषाने दूरदेशी जाऊन पुष्कळ द्रव्य कमावून आणले व आपल्या गावाजवळ येताच चोरांनी ते सर्व लुटून नेले, त्यामुळे पुनः दरिद्री तो दरीद्रीच राहिला. त्याप्रमाणे आयुष्यभर तपश्चरण करून अंतसयमी आराधना धारण न केली अथवा धारण करून ती सोडली तर त्याचा जन्ममरणाचा फेर चुकला नाही तो नाहीच.

सन्यास धारण करण्यापूर्वी काय करावे (

स्नेहं वैरं संगं परिग्रहं चापहाय शुद्धमनाः।

स्वजनं परिजनमपि च क्षान्त्वा क्षमयेत्प्रियैर्वचनैः ।।१२४।।

अन्वयार्थ - (शुद्धमनाः) शुद्ध अंतःकरण धारण करणाऱ्यांनी (स्नेहं) स्नेहं, (वैरं) वैर (संगं) संबध (च) आणि (परिग्रहं) परिग्रह (अपहाय) सोडून द्यावा. (स्वजनं परिजनं अपिच) आपल्या आप्त-इष्टमित्रावर आणि नौकरचाकरावर (क्षान्त्वा) क्षमा ग्रहण करण्यास सांगावे.

विशेषार्थ :- सम्यग्ज्ञानी पुरुषाचे स्नेह आणि वैर हे दोन्ही नाहीसे झालेले असतात. तो असा विचार करतो की, ((या पर्यायात मी कर्मवशाने उत्पन्न झालो. उपकारक आणि अपकारक पदार्थातून पुण्यपाप कर्मोदयानुसार बाह्य स्त्री-पुत्र-मित्रादिकांवर उपकार करण्याकरिता दान-सन्मान व स्नेह-प्रेमादि ज्या क्रिया केल्या व या पर्यायात उपकार पदार्थांचा नाश करणारे होते, त्याशी चारित्रमोहनीय कर्माच्या उदयाने वैर करून त्यापासून पराङ्मुख झालो. आता हा पर्याय नष्ट होण्याचा समय प्राप्त झाला. आता हा पर्याय नष्ट होण्याचा समय प्राप्त झाला. यावेळी कोणावर प्रीती व कोणाशी वैर करू ( माझा त्यांच्या आत्म्याशी मुळीच संबंध नाही. मी त्यांच्या आत्म्याला जाणीत नाही व ते माझ्या आत्म्याला जाणीत नाहीत. केवळ आम्ही परस्परांचे शरीरावरील चर्म पाहून रागद्वेष करू लागतो. पण हे चर्म भस्म होऊन जाणारे असून त्याचे परमाणू हवेत उडून नाहीसे होणार आहेत. अशा स्थितीत कोणाशी स्नेह व वैर करावेय उलट जे अभिमानामुले आपणाशी विनाकारण वैर करणारे असतील त्याशी नम्रपणाने वागून मजकजडून जी काही चूकभूल झाली असेल व मी जे काही आपणाशी उद्धटपणाचे वर्तन केले असेल त्याबद्दल मी आपणांशी नम्रपणाने क्षमा मागत आहे. आपण माझे अपराध पोटात घेऊन माफ करावे. आपणासारख्या सज्जनाशिवाय अपराधाची क्षमा करण्यास दुसरा कोण समर्थ आहे(( असे म्हणून त्याची क्षमा मागावी. दुसरे, आपण कोणाच्या जमिनीची अथवा कोणाच्या द्रव्याची अभिलाषा धरून ती बळकाविली असेल तर ती त्यास परत देऊन त्यास संतुष्ट करावे व आपण केलेल्या दुष्टपणाबद्दल त्याजपाशी क्षमा मागवी. त्यावेळी त्यांना नम्रपणे म्हणावे, ((महाराज, म्यां पाप्याने दुष्ट बुद्धीने आपले धन अथवा जमीन बळकाविली व ती तुम्हास परत दिली नाही, ही मोठी चूक केली. आता आपण आपली वस्तू ग्रहण करा. म्या दुष्टाने कपट करून, लोभाने अंध होऊन दुराचरण केले, त्याबद्दल मला अंतरंगात पश्चात्ताप झाला आहे. मी आपली वस्तू घेऊन आपणास फार दुःख दिले व आपण जे अपराध केले ते काही केल्या भरून येणारे नाहीत. आपण त्याबद्दल क्षमा करा.(( याप्रमाणे सरळपणाने त्याला क्षमा करण्याविषयी प्रार्थना करावी. आपल्या कुकटुंबातील माणसांना, मित्रांना व आत्पेष्टांना म्हणावे, ((महाराज, आपण सर्व आमचे आत्पवर्गस्नेही सोबती आहा. तुमचा आमचा या जन्माचाच संबंध आहे. आई-बाप जन्म देणारे आहेत. स्त्री शरीराला सुख देणारी आहे. पुत्र -पुत्रीचा जन्म मनापासून झालेला आहे. या शरीराच्या संबंधांमुळे इत्म या सर्व मंडळींचा संबंध मजशी जडलेला आहे. तुमचा आमचा संबंध या नाशवंत शरीराचे अस्तित्व असेपर्यंत राहिला. आता हे शरीर नष्ट होणार आहे. याची सत्ता आयुकर्माच्या आधीन झालेली आहे म्हणून यावर प्रेम करणे व्यर्थ आहे. या देहावर तुम्ही प्रेमे केले म्हणून तो थोडाच राहणार आहे( अग्निसंस्कार होताच तो भस्म होऊन जईल व याचे परमाणू चोहोंकडे विखरून जातील. पण माझा आत्मा हा ज्ञानस्वरूप, अविनाशी, अखंड आहे. तोच माझे खरे स्वरूप आहे. निजस्वभावाचा नाश होत नाही. ज्याचा

संयग असेल त्याचा अवश्य वियोग आहेच. म्हणून या विनाशिक, अज्ञान, जडस्वरू प शरीरावरील स्नेह टाकून आपल्या अविनाशी व ज्ञायक आत्म्यावर उपकार करण्यास उद्युक्‍ टहोणे हेच योग्य आहे. माझ्या ज्ञान दर्शनस्वभावी आत्म्याचा रागद्वेषमोहादि विकारांनी घात होणार नाही. त्याला वीतरागमय निजस्वभावाची प्राप्ती जेणे करू न होईल असा यत्न करावा. शरीराविषयी विचार करता अशी शरीरे तर अनंतानंत धारण करू न सोडली आहेत. त्याचे मला महत्त्व वाटत नाही. फक्‍त दर्शनज्ञानचारित्र यांचे विपरीत श्रद्धान केल्याने चारही गतीमध्ये भ्रमण करावे लागेल, याचाच मला संताप होत आहे माझे सर्व पदार्थाला जाणण्याचे सर्वज्ञ-स्वरू प कोणीकडे व अक्षराच्या अनंताव्या भाताइतके सूक्ष्म ज्ञान असणारा एकेंद्रिय पर्याय कोणीकडे( अनंतशक्‍तिधारक माझा आत्मा असताना ती सर्व शक्‍ती अंतराय कर्माच्या उदयने नाहीशी झाली. त्यामुळे पृथ्वी, पाषाण, जल, अग्नी, वायू, वनस्पती वगैरे पंचस्थावर जीवामध्ये अथवा द्वींद्रियापासून पंचेंद्रिय जव होऊन जन्म घ्यावा लागला. हे सर्व मिथ्याज्ञानश्रद्धान आचरणाचे फल आहे. अनंतानंतकाल गेल्यावर सांप्रत कर्माचा क्षयोपशम झाल्यामुळे, वीतराग परमेश्रांनी उपदेशिलेल्या स्याद्वादरू प वाणीचे श्रवण करू न मला स्वस्वरू प-परसवरू पाती भेदाचे यत्किंचित ज्ञान झाले आहे. तयअर्थी मी आत असा स्नेह धारण करावा की, त्यापासून आतमा रगदवेषरहित निर्भय होऊन य शरीराचा तयग करण्यास उद्युकत होईल व आराधनेचे शरण ग्रहण करील. अनादिकालापासून मला बालमरण घडून आले. त्यातून एकदा जरी पंडित-मरण घडले असते तर मी पुन: मरणाला प्राप्त झालो नसतो. असो, आता तरी शरीरावरील ममत्व सोडून ज्यायोगे माझा आतमा रागद्वेषाच्या वश होऊन संसारसमुद्रा बुडणार नाही असा प्रयत्न केला पाहिजे.(( याप्रमाणे सर्व विकार सोडून, परिग्रहावरील ममता सोडून मन पवित्र करावे

समाधिमरण करू इच्छिणाऱ्याने काय करावे-

आलोच्य सर्वमेन: कृतकारितमनुमतं च निर्व्याजम्।
आरोपयेन्महाव्रतमामरणस्थायि नि:शेषम्।।१२५।।

अन्वयार्थ-(कृतं) आजपर्यंत आपण स्वत: जेपाप केले असेल, (कारितं) दुसऱ्याकडून करविले असेल व (अनुमतंच) करणाऱ्यास अनुमोदना दिली असेल (सर्वं एन:) त्या सर्व पापांची, (निर्व्याजं) कपट न ठेवता गुरू पाशी (आलोच्य) आलोचना करावी आणि (आमरणस्थायि) मरणापर्यंत (नि:शेषम् महाव्रतं आरोपयेत्) पूर्ण महाव्रते धारण करावी.

विशेषार्थ - वीतरागी निर्दोष गुरू चा संयोग प्राप्त होईल, आपल्या अंत:करणातून रोगद्वेषादि विकार कमी होतील, परीषह प्राप्त झाले असता ते सहन करण्यास आपले मन व शरीर तयार असेल. धैर्य वगैरे अनेक गुण आपल्या अंगी बाणले असतील, निर्ग्रंथ वीतराग गुरू वरचेवर उपदेश देऊन यातून पार पाडण्यास तयार असतील व देशकाल परिस्थिती अनुकुल असेल तर महाव्रताचा अंगीकार करावा. या प्रकारची बाह्य सामग्री उपलब्ध नसेल तर आपल्या अंत:करणातच भगवान पंचपरमेष्ठांचे ध्यान करू न रिहंताच्या प्रतिमेजवळ बसून आलोचना करावी व आपल्या योग्यतेप्रमाणे संपूर्ण पंचपापांचा त्याग करू न घरात राहावे. महाव्रती साधूप्रमाणे रोगादिकांची वेदना प्राप्त झाली असता न घाबरता ती धैर्याने सहन करावी. त्यावेळी त्या वेदना आपल्याला भासत आहेत असे बाहेर दाखवू नये. कर्माचा उदय सहन करू न

तो स्वस्वभावाहून वेगळा आहे असा पक्का मनात निश्चय करावा. सर्व शत्रुमित्रांच्या संयोग-वियोगामध्ये समता धारण करावी. परिग्रहाची उपाधी टाकावी. संकल्प-विकल्प मनात आणू नये. संन्यास ग्रहणाच्या वेळी परिग्रहाचा त्याग करावा, म्हणजे प्रथमत: आपल्याला कोणाचे ऋण असल्यास ते देऊन टाकावे. दुसऱ्या कोणाची ठेव, जमीन जुमला आपणाजवळ विश्वासाने ठेवलेली असेल तर ती ज्याची त्यास परत देऊन त्यास संतुष्ट करावे. आत्मनिंदा करून वाईट कर्म केल्याबद्दल पश्चात्ताप करावा. यानंतर आपणाजवळ जे धन व परिग्रह राहिला असेल त्याचा विभाग करून ते स्त्रीला, पुत्राला, मुलींना, दीन, अनाथ, विधवा, अबला, दु:खी आश्रयरहित आपली बहीण, भाऊबंद वगैरे कोणी असल्यास त्यांना देऊन टाकावे, याप्रमामे सर्व परिग्रह सोडून त्यावरील ममता कमी करावी व मनात विचार करावा की, ((आता या परिग्रहांचा व आपला कितीसा संबंध टिकणारा आहे( ज्या देहाच्या संबंधाने या सर्व परिग्रहावर ममता करीत होतो तो देहच जर आता सोडावयाचा विचार केला, तर तत्संबंधी परिग्रहावर ममता करून काय करावयाचे( आता आपण आत्म्याशी संबंध असणार्या सम्यग्दर्शन ज्ञान-चारित्रावर ममता केली पाहिजे. काण तेच निजस्वभाव आहेत. देह हा हाड, मांस, पू, रक्त तांनी भरलेला कृतघ्न व जड आहे तो आमचा नव्हे व आपण त्याचे नव्हे. मी आत्मस्वरूप अविनाशी आहे. अज्ञानामुले आम्ही नाशवंत शरीरावल प्रेम करीत आहोत. त्यामुळे अशुभ कर्माचा बंध होत आहे याप्रमाणे देहाचा जो संबंध या आत्म्याशी झालेला आहे तो पुरे. यापुढे तो न जडावा अशी मनापासून इचछा आहे. य दहार ममतव केल्यामुळे आजपर्यंत अनंत जन्ममरणाचे फेर करावे लागले. संसारात जेवढे म्हणून दु:खाचे प्रका आहेत तेवढे सर्व या शरीराच्या संबंधामुळेच उत्पन्न झाले आहेत. रागद्वेषमोहकामक्रोध वगैरे विकारांच्या उत्पत्तीला तरी हा दहच कारण आहे म्हणून आत त्यावरील एक वेळ ममत्व सोडून वैराग्यवृत्ती धाण करावी.((

शोकं भयमवसादंक्लेदं कालुष्यमरतिमपि हित्वा।

सत्त्वोत्साहमुदीर्य च मन:प्रसाध्यं श्रुतैरमृतै:।।१२६।।

अन्वयार्थ-(शोकं) संन्यासकाली शोक, (भयं) भीति, (अवसादं) विषाद, (क्लेदं) स्नेह (कालुष्यं) कलुषपणा (अरतिं अपि) अरति वगैरेचा (हित्वा) त्याग करावा आणि (सत्त्वोत्साहं उदीर्य) बल व उत्साह प्रकट करून (अमृतै: श्रुतै:) अमृतासारख्या गोड ज्ञानांनी आपले (मन:प्रसाध्यं) मन प्रसन्न करावे.

विशेषार्थ - अनादिकापासून जीवाला शरीर हेच आपले स्वरूप वाटते आहे. या शरीराचा नाश होणे हाच आपला नाश आहे अशी त्याची समजूत आहे. ज्यावेळी या पर्यायाचा नाश आणि धन,स्त्री, मित्र, भांधवादिक सर्वांचा वियोग होण्याचा प्रसंग येतो, त्यावेळी मिथ्यादृष्टी जीवाला अतिशय दु:ख होते, तसे सम्यग्दृष्टी जीवाला होत नाही. तो त्यावेळी असा विचार मनात आणतो, ((हे आत्मन्, तुला अशी शरीरे आजपावेतो अनंतानंत प्राप्त होऊन नाहीशी झाली आहेत. शरीर अनेक रोगाच्या उत्पत्तीचे स्थान आहे ना( याला नेहमी क्षुधा, तृषा, शीत, उष्ण वगैरे वेदना उत्पन्न होतात. हे अतिशय कृतघ्न आहे व याचा अवश्य नाश होणार आहे. यापासून आत्म्याला सर्व प्रकारचे दु:ख भोगावे लागत आहे म्हणून दुष्ट लोकांच्या संगतीप्रमाणे याचा त्याग करणे अवश्य आहे. हे सर्व दु:खाचे बीज असून अतिशय संताप उत्पन्न करणारे आहे. यापासून सदैव भय उत्पन्न होते. हे तुरुंगाप्रमाणे नेहमी आत्म्याला पराधीन ठेवणारे आहे. दु:खाच्या जेवढ्या म्हणून जाती आहेत त्या सर्व याच्या संयोगामुळे भोगाव्या लागतात.

यामुळेच आत्मस्वरू पाची बुरळ पडते. वरचेवर इच्छा उत्पन्न होऊन फारक्लेश सोसावे लागतात. हे अतिशय दुर्गंधी असून अनेक किड्यांनी भरलेले आहे. हे एखाद्या दुष्ट भावाप्राणे अथवा बलढ्याच्या शत्रूसारके दु:ख देणारे आहे. अशा शरीराचा नाश झाला असता शोक करण्याचे काय प्रयोजन( म्हणूनच ज्ञानी पुरुष याचा वियोग झाला असता दु:ख करीत नाहीत व मरणाचे भय बाळगीत नाहीत. ते विषाद, स्नेह, कलुषपणा, अरतिभाव सोडून उत्साह व साहस प्रकट करू न श्रुतज्ञान हेच कोणी एक अमृत त्याचे पान करतात व मन तृप्त करू न घेतात.((

याच श्लोकाच्या पुष्टयर्थ मृत्युमहोत्सवाचा अठरा श्लोकांचा पाठ आहे, तो येथे सांगितला असता वरील सल्लेखनेच्या उपचिंतनाला दुजोरा मिळे, या दृष्टीने त्याचे वर्णन येथे करणे अप्रस्तुत होणार नाही.

मृत्यु-महोत्सव

मृत्युमार्गो प्रवृत्तस्य वीतरागो ददातु मे।
समाधिबोधिपाथेयं यावन्मुक्तिपुरी पुर:।।१।।

अर्थ - मृत्यूच्या पंथाला लागलेल्या मला भगवान् वीतराग समाधि म्हणजे ापल्या स्वरू पाविषयी सावधानी व बोधि म्हणजे रत्नत्रयाचा लाभ हीच कोणी एक शिदोरी देवोत. कारण मला मोक्षनगरीला पोहोचेपर्यन्त या दोहोंचा शिदोरीसारखा उपयोग होणार आहे.

भावर्थ - मी अनादिकालापासून अनंत जन्ममरणाचे फेरे केले ते एक सर्वज्ञच जाणू शकतील. आजपर्यन्त एक वेळही समाधिमरण साधले नाही. ते जर साधले असते तर मी पुन: या संसारात जन्ममरणाला पात्र झालो नसतो. सम्यक्मपण अथवा समाधिमरण म्हणजे ज्या टिकाणी फक्त शरीराचा नाश व्हावयाचा, शरीराबरोबर असलेल्या आत्म्याच्या सम्यग्दर्शन, ज्ञान, चारित्रस्वभावाचा कषायामुळे घात नव्हे. कुमरण म्हणे मिथ्याश्रद्धानाने देहाच्या नाशालाच आत्म्याचा नाश समजणे व अतिशय दु:ख करू न मरणे. मी आजपर्यंत मिथ्यादर्शनाच्या प्रभावाने शरीराचा नाश झाला असता आत्म्याचाही नाश झाला असे मानले व आपल्या ज्ञानदर्शन स्वरू पाचा घात करू न अनंत परिवर्तन केले. आता भगवंताला अशी प्रार्थना करतो की, ((हे प्रभो, मला मरणसमयी वेदनायुक्त मरण व आत्मज्ञानरहित मरण प्राप्त होऊ नये. कारण आपण जन्ममरणरहित आहात व मी आपणाला शरण येऊन संक्लेशरहित धर्मध्यानात लीन होऊन मरण यावे अशी इच्छा करणार आहे.(( याप्रमाणे चिंतन करू न वीतगरापरमेष्ठीला शरण जावे.

यानंतर आपण आपल्या आत्म्याला समजविण्याचा प्रयत्न करावा तो असा-

कृमिजालशताकीर्णे जर्जरे देहपंजरे।
भज्यमाने न भेतव्यं यतस्त्वं ज्ञानविग्रह:।।२।।

अर्थ- हे आत्मन् ( ज्याअर्थी तू ज्ञानशरीरी आहेस त्याअर्थी तुला शेकडो किड्यांच्या जाळ्याने भरलेल्या व जीर्ण होणाऱ्या या देहरू पी पिंजऱ्याचा नाश झाला याची भीती बाळगण्याचे कारण नाही.

भावार्थ - आत्म्न् ( जे तुझे स्वरू पज्ञान आहे त्या ज्ञानात सर्व पदार्थांचे प्रतिबिंब पडलेले आहे. तू अमूर्तिक, ज्योति:स्वरू पी, अखंड, अविनाशी, ज्ञाता व द्रष्टा आहेस, हा देह हाड, मांस, पू, रक्त, चामड्यांनी मढलेला असून नाशवंत आहे. अर्थात हा तुझ्या स्वरू पाहून अत्यंत भिन्न आहे. कर्मवशे इ

ााल्याने देहोंचा एकक्षेत्रावगाह संबंध झालेला आहे व दोन्ही जणू एकरू पाने आहेत असा भास होत आहे. तरी पण तुझ्यात व यात पुष्कळ भेद आहेत. हे लक्षात ठेव. देह हा नोकर्म वर्गणारू प आहार वर्गणेच्या परमाणूंचा पिंड आहे. हा प्रसंगविशेषी विखरू न जोईल, परंतु तू मात्र अविनाशी अखंड ज्ञायकस्वरू प असल्याने शरीराचा नाश झाला असता आपलाही नाश होईल अशी भीती कां बाळगतोस ते समजत नाही.

ज्ञानिन् भयं भवेत्कस्मात्प्राप्ते मृत्युमहत्सवे।

स्वरू पस्थः पुरं याति देही देहांतरस्थितिः।।३।।

अर्थ- हे ज्ञानीपुरुषा( मृत्यु हाच कोणी एक महान् उत्सव प्राप्त झाला असता तू भयभीत कां होतोस( असे( हा आत्मा स्वस्वरू पामध्ये राहणारा असून हे शरीर सोडून दुसऱ्या शरीररू प शहरात वास करण्यारिता जात आहे.

भावार्थ - एखादा पुरुष जीर्ण पर्णकुटिका सोडून दुसऱ्या सुंदर महालात राहण्यास जात असतो तो दिवस मोठ्या आनंदाचा मानतो. त्याप्रमाणे हा आत्मा स्वस्वरू पात विराजमान होण्यासाठी ही जीर्ण झ ाालेली देहरू पी झोपडी सोडून नवीन दुसऱ्या देहरू पी महालात राहण्यास जात आहे. अर्थात हा दिवस त्याने अत्यंत आनंदाचा समजला पाहिजे. यात नुकसान कसेल( म्हणून मृत्यू प्राप्त झाला म्हणून भिण्याचे कारण नाही. आपल्या ज्ञायक स्वभावामध्ये स्थिर राहून परवस्तूविषयी आपलेपणा सोडला व अशा स्थितीत जर तुम्हाला मृत्यू येईल तर त्यापासून परलोकी सत्पधातु-उपधातुरहित दिव्या अशा वैक्रियिक देहाची प्राप्ती होऊन देवलोकी जन्म होईल व अनेक ऋद्धी प्राप्त होऊन तेथील देव तुमचा आदर सन्मान करतील. येथे मरणाचे भय बाळगून ज्ञानस्वभाव सोडाल व अंती मोहात प्राणोत्क्रमण होईल तर एकेंद्रियादिक पर्यायात उत्पन्न व्हावे लागूत त्या ठिकाणी तुमच्या ज्ञानाचा नाश होऊन जड होऊन राहवे लागेल. सारांश-मलिन व दुःखदायक शरीराचा त्याग करू न दुसरे निर्मल व तेजःपुंज शरीर धारण करण्याकरिता ज्या दिवशी जावयाचे तो दिवस मोठ्या उत्सवाचा मानला पाहिजे.

सुदत्तं प्राप्यते यस्मात् दृश्यते पूर्वसत्तमैः।

भुज्यते स्वर्भवं सौख्यं मृत्योर्भीतिः कुः सताम्।।४।।

अर्थ- पूर्वकालीन ऋषी व गणधरादिक सत्पुरुष असे दाखवितात की, ज्या मृत्यूमुळे उत्तम प्रकारचे फल प्राप्त होते व स्वर्गलोकातील सुख उपभोगण्यास मिळते त्या मृत्यूचे सत्पुरुषांना भय कसले(

भावार्थ-आपण जे काही या जन्मात बरे केले असेल त्याचे फल मृत्यू प्राप्त झाला तरच प्राप्त होणार आहे. आपण षट्काय जीवांना अभयदान दिले असेल, रागद्वेष कामक्रोधादिकाचा नाश करू न असत्य, अन्याय, व्यभिचार, परधनहरणादिक क्रियांचा त्याग केला असेल, कर्मोदयाने प्राप्त होईल तेव्ढ्यात संतोष मानून इतर आत्म्याला अभयदान दिले असेल, तर त्याचे फल स्वर्गलोकाशिवाय इतरत्र कोठे भोगावयास मिळणार आहे( म्हणून स्वर्गलोकातील सुख हे मृत्यु नामक मित्रांच्या प्रसादानेच प्राप्त होणार आहे. सारांश-मृत्यूसारखा या जीवावर उपकार करणारा दुसरा कोणी नाही. हा लौकर न येता तर मनुष्यपर्यायातील जीर्ण देहात कोणकोणती दुःखे किती कालपर्यंत भोगावी लागली असती याची कल्पना करवत नाही व त्यापासून आर्तध्यान, रौद्रध्यान उत्पन्न होऊन नरकाला जावे लागले असते. आता

मरण्याचे भय व देह-कुटुंबपरिग्रहावरील ममता ठेवून चिंतामणि-कल्पवृक्षासारख्या समाधिमरणाचा त्याग करून कुमरणाने दुर्गतीला जाणे योग्य नाही.

आगर्भाद्दु:खसंतप्त: प्रक्षिप्तो देहपंजरे।
नात्मा विमुच्यते(न्येन मृत्युभूमिपतिं विना।।५।।

अर्थ- कर्मरूपी शत्रूंनी आत्म्याला शरीररूपी पिंजऱ्यात टाकले आहे. त्यामुळे गर्भापासून आजपावेतो एकसारखे क्षुधा-तृषा, रोग-वियोगादि अनेक दु:खांनी तो संतप्त झाला आहे. अशा दु:खातून मृत्युरूपी राजाशिवाय आत्म्याला दुसरा कोणीही सोडविणारा नाही.

भावार्थ - देहरूपी पिंजऱ्यात कर्मशत्रूंनी अडकविल्यामुळे इंद्रियांच्या स्वाधीन होऊन अनेक प्रकारचा त्रास मी सहन करीत आहे. रात्रंदिवस क्षुधातृषेची वेदना पीडा देत आहे. श्वोसोच्छ्वासाच्या क्रियेने व रोगाच्या वेदनेने जीव नेहमी व्याकुळ होत आहे. उदरपोषणाकरिता नेहमी परतंत्र होऊन सेवा-चाकरी, शेतकी किंवा वाणिज्य इत्यादि क्रिया कराव्या लागून त्यात अनेक प्रकारे दु:ख सहन करावे लागत आहे. शीतउष्णाची पीडा व ताडन, मारण, अपमान कुवचन श्रवण वगैरे सोसावे लागत असून, कुटुंबातील माणसाची प्रवृत्ती पाहून तदनुरूप राहावे लागत आहे. द्रव्याच्या, राज्याच्या, स्त्री-पुरु,ांच्या आधीन होऊन राहणे भाग आहे. याप्रमाणे हे शरीर म्हणजे केवळ तुरुंग आहे. यातून मृत्यू नामक बलिष्ठ राजाशिवाय कोण सुटका करणारा आहे( या सरीराला सांभाळावे तरी कोठवर( रात्रंदिवस यातून मलमूत्रादिकांचा प्रवाह वाहात आहेच. याला उठवा, बसवा, जेवू घाला, पाणी पाजा, स्नान घाला, झोप घेऊ द्या, कामादिक विषयाकडे वळवा, अनेक प्रकारच्या वस्त्राभरणांनी भूषवून, रात्रंदिवस याची सेवा करता करता आत्म्याला फार कष्ट सहन करावे लागत आहेत. या शरीरामुलेच आत्म्याला भय बाळगावे लागत आहे. हे शरीरच आत्म्याला स्वस्वरूपाविषयी भुरळ पाडीत आहे. तरी अशा कृतघ्न देहापासून सुटका होण्यास मृत्युराजाचे साहाय्य घेणे हेच आवश्यक आहे.

सर्वदु:खप्रदं पिण्डं दूरीकृत्यात्मदर्शिभि:।
मृत्युमित्रप्रसादेन प्राप्यन्ते सुखसंपद:।।६।।

अर्थ - आत्मदर्शी म्हणजे आत्मज्ञानी पुरुष मृत्युनामक मित्राच्या प्रसादाने सर्व प्रकारचे दु:ख देणार्या शरीरपिंडाला नाहीसे करून सुखसंपत्ती प्राप्त करून घेतात.

भावार्थ- जे या सप्तधातूपधातूंनी भरलेल्या अतिशय अशुद्ध व दु:खदायी शरीराला सोडून वैक्रियिक (देवाचे) शरीर प्राप्त करून घेतात व अनेक प्रकारच्या सुखांचा उपभोग घेतात त्यांना ते सर्व समाधिमरणामुले प्राप्त होते. समाधिमरणासारखा या जीवावर उपकार करणारा दुसरा पदार्थ नाही. शरीरात राहून अनंत प्रकारचे दु:ख सहन करणे, अनेक रोगांच्या वेदना सहन करून मरणे, पुन: पशुयोनीत अथवा नरकयोनीत असंख्यात कालपर्यंत असंख्य दु:ख भोगणे व जन्ममरणरूप अनंत परिवर्तन करीत राहणे, या परिस्थितीत कोणीही रक्षण करण्यास समर्थ नाही. कदाचित अशुभकर्माच्या मंद उदयाने मनुष्ययोनी, उच्चकुल, इंद्रियपरिपूर्णता, सत्पुरुषसमागम, भगवान वीतराग सर्वज्ञांनी प्ररूपण केलेल्या शास्त्राचा उपदेश प्राप्त झाला असता ज्ञान, त्याग व संयम यायोगे कुटुंबपरिग्रहावरील ममत्व सोडून शरीराहून भिन्न आत्म्याला जाणणे व ज्ञानस्वरूप आत्म्याचा अनूभव निर्भयतने घेत राहणे,

चार आरधनांचे चिंतन करीत प्राणत्याग करणे अशी अवस्था प्राप्त झाली तर त्रैलोक्यात व तिन्ही कालात या जीवाचे सार्थक्य झाले. सारांश-संसारपरिभ्रमणापासून सुटणे हा समाधिमरणनामक मित्राचा प्रसाद आहे.

मृत्युकल्पद्रुमे प्राप्ते येनात्मार्थो न साधित:।
निमग्नो जन्मजम्बाले स पश्चत् किं करिष्यति।।७।।

अर्थ- ज्याला मृत्यु हाच कोणी कल्पवृक्ष लाभला असता आपले कल्याण करून घेता आले नाही., तो जन्ममृत्युरूप संसाररूपी चिखलात फसला गेला, आता तो काय करू शकणार(

भावार्थ - मनुष्यजन्मात मरणाचा संयोग हा साक्षात् कल्पवृक्ष आहे असे समजा. जे काही आपल्या इच्छेप्रमाणे मागणे आहे ते यापासून मागून घ्या. जर ज्ञान प्राप्त करून घेऊन स्वस्वरूपाला ओळखाल आणि आराधना धारण करून मरण प्राप्त करून घ्याल तर स्वर्गात महान् ऋद्धिधारक देव, इंद्र, अहमिंद्र होऊन क्रमाने चक्रवर्तिपद व तीर्थंकरपदवी धारण करून मोक्षास जाल. मरणासारखा दुसरा दाता त्रैलोक्यात नाही. असा दाता प्राप्त झाला असूनही जर विषयकषायाची इच्छा कराल तर त्यापासून नरकनिगोद प्राप्त होईल. मरणरूपी कल्पवृक्षाचा बिघाड कराल तर तुमचे ज्ञानरूपी अक्षय्य भांडार नाहीसे होऊन, चिरकाल संसारात भ्रमण कराल. इच्छेला वश होऊन तुम्ही जर लबाड माणसाची सोबत धराल, अतिशय लोभाने विषयोपभोग प्राप्त व्हावे म्हणून व द्रव्यप्राप्तीकरिता हिंसा, लबाडी, चोरी, व्यभिचार व अपरिमित परिग्रह यामध्ये आसक्त होऊन, अतिनिंद्य कर्म करण्यास उद्युक्त व्हाल तर त्यापासून तुमच्या इच्छेप्रमाणे फल-प्राप्ती तरी होते काय( नाही. उलट सर्व वेळ आर्तध्यानात जाऊन दु:ख सहन करीत रहावे लागते. कुटुंबातील सर्व माणसांना सोडून द्रव्याच्या आशेने देशपरदेशात भ्रमण करावे लागते. अनेक प्रकारचे लोकनिंद्य आचरण करावे लागते. यापेक्षा जर एक वेळ समता धारण करून व्रत, तप, संयमासहित मरण प्राप्त करून घ्याल तर पुन: संसारपरिभ्रमणाचा फेरा प्राप्त न होता, अविनाशी मोक्ष-सुखाला मिळवाल, म्हणून ज्ञानयुक्त समाधिमरण साधणे हेच योग्य आहे.

जीर्णदेहादिकं सर्वनूतनं जायते यत:।
स मृत्यु: किं न मोदाय सतां सातोत्थितिर्यथा।।८।।

अर्थ- ज्या मृत्यूमुले जीर्व झालेला देह वगैरे सर्व नाहीसे होऊन नवीन प्राप्त होतात तो मृत्यू सत्पुरुषांना साताकर्माच्या उदयाप्रमाणे आनंददायक होणार नाही काय( ज्ञानी पुरुषांना मरण आले असता आनंदच होईल.

भावार्थ - मनुष्यशरीर प्रत्येक क्षणी जीर्ण होत आहे. देवांच्या शरीराप्रमाणे याला म्हातारपण सुटलेले नाही. प्रतिदिवशी याची शक्ती कमी होत असून कांती व स्वरूप मलिन होत आहे. दिवसेंदिवस या शरीरातू नाजूकपणा कमी होत आहे. सर्व स्नायूंची बंधने शिथिल होत आहेत. कातड्यावर सुरकुत्या पडत आहेत. शरीरातून वरचेवर मांस कमी होत आहे. कानाची श्रवण करण्याची शक्ती कमी होत आहे. हातापायातील बल कमी होत आहे. चालण्याची शक्ती कमी होत आहे. उठता, बसता, चालताना वरचेवर थकवा वाटत आहे, कफाची वरचेवर वृद्धी होत आहे. अनेक नवे रोग उत्पन्न होत आहेत. याप्रमाणे नेहमी जीर्ण होत असलेल्या देहाचा नाश जाला असता दु:ख काय म्हणून करावयाचे व असा जीर्ण देह राहूनही

त्यापासून तु:ख तरी किती काळ भोगीत रहावयाचे( हे शरीर अशा स्थितीत किती काल झिजत राहील हे तरी कोणास ठाऊक( तेव्हा या सर्व दु:खातून सोडविण्यास एका मरण्यासारख्या उदार दात्याशिवाय दुसरा कोण समर्त असणार( सर्वस्वी निंद्य अशा शरीरात वास्तव्य करावे लागल्याने असाताकर्माचे उदय प्राप्त होऊन दु:ख देऊ लागतात. ती सर्व दु:खे मरण प्राप्त झाले तर नाहीशी होणारी आहेत. या दृष्टीने सम्यग्ज्ञानी पुरुषांना मृत्यू आला असता अतिशय ईश होत असतो. कारण त्यांना वाटते की, आता आपण व्रत, शील, संयम वगैरे तपश्चरणात सावधानी राहील असा यत्न केला असता पुन: आपणाला याप्रकारच्या दु:खाने भरलेला देह धारण करावा लागणार नाही. सारांश, सम्यग्ज्ञानी पुरुष मरणालाच जणू साताकर्माचा उदय मानतो.

सुखं दु:खं सदा वेत्ति देहस्थश्च स्वयं व्रजेत् ।
मृत्युभीतिस्तदा कस्य जायते परमार्तत: ।।९।।

अर्त- हा आत्मा शरीरात राहूनही सुखदु:खाला सदैव जाणत असतो व परलोकीही स्वत:च गमन करतो. मग परमार्थ-दृष्टीने विचार केला असता मरणाचे भय कोणाला होते हे सांगा पाहू(

भावार्थ- अज्ञानी जीवाची समजू आत्मा आणि देह हे भिन्न नाहीत अशी असते. अशा जीवांना परमागमात बहिरात्मा अशी संज्ञा आहे. हे बहिरात्मा जीव स्वत:लाच मी सुखी, मी दु:खी, मी क्षुधित, मी तृ,ति, मी मृत वगैरे मानीत असतात. या उलट अंतरात्मा सम्यग्ज्ञानी असे मानतात की जो उत्पन्न झाला तो अवश्य मरणार. पृथ्वी, जल, अग्नी, वायू या चतुष्ट्यापासून उत्पन्न झालेला पुद्गलपिंड अवश्य कधी तरी नाहीसा होणार. मी ज्ञानस्वरूप, अमूर्तिक असल्याने माझा मात्र कधीही नाश होणार नाही. क्षुधा, तृषा, वात, पित्त, कफादिकांची वेदना पुद्गलाला होत असते. मी (आत्मा) फक्त या सुखदु:खांना जाणणारा आहे. असे असून सुखदु:खाविषयी हा विनाकारण अहंकार बाळगीत आहे. शरीर आणि आत्मा जरी एकाच ठिकाण राहात आहेत तरी आत्म्याचे स्वरूप (ज्ञान( हे असून पुद्गलाचे स्वरूप (जड( आहे. आत्मा अमूर्ति, देह मूर्तिक, आत्मा अखंड व एक, शरीर अनेक परमाणूंचा पिंडा मिळून बनलेले, आत्मा अविनाशी, देह नाशवंत, शरीरात जे रोग, क्षुधातृषादि विकार उत्पन्न होतात त्याचे ज्ञान आत्म्याला होते एवढे खरे. कारण, आत्म्याला ज्ञायकस्वभाव आहे. याविरूद्ध पदार्थावर ममत्व ठेवणे हे अज्ञान अथवा मिथ्यात्व होय. आपण एक घर सोडून दुसऱ्या घरात राहण्यास जातो तसे शुभाशुभ कर्माने बनविलेल्या दुसऱ्या शरीरात आत्म्याला जावयाचे आहे. यात त्याच्या स्वरूपाचा नाश होत नाही, म्हणून मरणाची भीती धरण्याचे कारण नाही.

संसारासक्तचित्तानां मृत्युर्भीत्यै भवेन्नृणाम् ।
मोदायते पुन: सो(पि ज्ञानवैराग्यवासिनाम् ।।१०।।

अर्थ- ज्याचे मन संसारात गढून गेले आहे व जे आपल्या स्वरूपाला जाणत नाहीत. त्यांनाच मृत्यू आला असता भीती वाटते. परंतु ज्यांना निजस्वरूपाचे ज्ञान झाले आहे व ज्यांना संसारातील अवस्था पाहून त्यापासून वैराग्य झाले आहे त्यांना मृत्यू हा आनंददायक वाटतो.

भावार्थ - मिथ्यादर्शनाच्या उदयाने ज्यांना आत्मज्ञान होत नाही ते शरीरालाच आपले मानून खाणे, पिणे, कामभोग सेवन करणे, इंद्रियांच्या विषयात रममाण होणे यातच सुख मानतात. त्यांना

बहिरात्मा जीव म्हणावे. अशा जीवांना मरणाचे अतिशय भय वाटते. त्यांना वाटते, ((आता माझा नाश होणार. यापुढे आपणाला खावयाला, प्यावयाला कोठून मिळेल( मरणानंतर आपले काय होणार न कळे( मरतांना काय काय दु:ख येते कोणास ठाऊक( यापुढे या सर्व कुटुंबातील प्रिय मनुष्यांचा समागम µÖÖ¯ÖÎ´ÖÖÞÖê †×ŸÖ¿ÖµÖ ¤ã:ÜÖ Ûú°þþ®Ö ŸÖê ´Ö¸ÞÖ ¯ÖÖ¾ÖŸÖÖŸÖ. ¯ÖÞÖ †ÖŸ´Ö–ÖÖ®Öß µÖÖ¾Öêô †ÃÖÖ ×¾Ö“ÖÖ¸ Ûú¸ŸÖÖŸÖ, ((†Ö´Ö“ÖÖ आत्मा शरीररूपी बंदीखान्यात पराधीन होऊन अडकून राहिला आहे व इंद्रियांच्या विषयरूप अग्नीने प्रापत होणाऱ्या विषयभोगांनी त्याची तृप्ती होत नाही. नित्य क्षुधा-तृषा-शीत-उष्ण रोग वगैरेपासून उत्पन्न होणाऱ्या वेदनेमुले एक क्षणमात्र देखील याला स्थिरता मिळत नाही. पराधीनतेमुळे आजपर्यंत याने अपमानासारखी दु:खे सोसली. अनिष्टयोगापासून होणारे दु:ख भोगले व त्या दु:खातच आपला सर्व काल पुरा केला. अशा दु:खातून किंवा वा पराधीनतेपासून मुक्त करून आपले अनंत सुखस्वरूप, जन्ममरणरहित, अविनाशी जे मोक्षस्थान त्याप्रत पोहोचविणारा मरणकाल सन्निध आला असता दु:ख काय म्हणून करावे( हे मरण अतिशय सुख देणारे, अतएव अत्यंत उपकारी आहे. या संसारात राहणे केवळ दु:खरूप आहे. अशा संसारात फक्त समाधिमरण हेच शरण जाण्यास योग्य आहे. याशिवाय दु:खिय जीवांचे रक्षण करणारे दुसरे स्थान आहे. हे आजपर्यंत प्राप्त झाले नाही. म्हणून तर चतुर्गतीत फिरावे लागले. आता संसारापासून वैराग्य उत्पन्न झाले आहे. त्याअर्थी मी समाधिमरणालाच शरण जाणार.((

पुराधीशो यदा याति सुकृतस्य बुभुत्सया।
तदासौ वार्यते केन प्रपञ्चै: पाञ्चभौतिकै: ।।११।।

अर्थ- ज्यावेळी हा आत्मा आपण केलेल्या सुकृताचे फल भोगण्याच्या इच्छेने परलोकी जातो त्यावेळी पंचमहाभूतात्मक शरीरादि समूहापैकी कोण याला प्रतिबंध करू शकणार(

भावार्थ- जीवाचे आयुष्य संपल्यानंतर परलोकी जाण्याची वेळ प्राप्त झाली असता त्याला शरीरादिक पंचमहाभूतात्मक पदार्थ रोकू शकत नाहीत. म्हणून मोठ्या आनंदोत्सवाने चार आराधनांना शरण जाऊन मरावे हे उत्तम होय.

मृत्युकाले सतां दु:खं उद्‌भवेद्‌व्याधिसंभवम्।
देहमोहविनाशाय मन्ये शिवसुखाय च ।।१२।।

अर्थ- मृत्यू प्राप्त झाला असता पूर्वकर्मोदयाने रोगादिक उत्पन्न होतात ते सत्पुरुषांना शरीरावरील प्रेम नाहीसे करून मोक्षसुख प्राप्त व्हावे यामुळेच होतात असे मला वाटते.

भावार्थ- या जीवाने जन्म घेतल्या क्षणापासून या शरीराशी त्नमय वृत्ती धारण करून यात वास्तव्य केले आहे. शरीराशिवाय दुसरे कोणतेही स्थान राहण्यास योग्य नाही असे त्यास वाटते आहे. आता अशा शरीरात रोग उत्पन्न होऊन दु:ख येऊ लागले म्हणजे सत्पुरु,ांना हे आपले खरे निवासस्थान नव्हे असे वाटते व ते त्यावरील मोह नाहीसा करतात. देहाचा साक्षात दु:खदायीपणा, नाश-स्वभाव व कृतघ्नपणा त्यांना दिसून येतो व ते अविनाशी पदप्राप्तीसाठी उद्योग करू लागतात, ((आजपर्यंत या शरीरावर ममता करून अनंत जन्ममरण, संयोगवियोग, रोगसंतापादिक व नरकाची दु:खे भोगली. पुन:

याच दु:खदायक शरीरावर प्रीति करू न स्वस्वरू पाला विसरू न एकें द्रियादिक अनेक कुयोनीत भ्रमण करविण्यास कारणीभूत असे कर्म उपार्जन करणे योग्य नाही. आता या शरीरात ज्वर, श्वास, खोकला, शूळ, वात, पित्त, अतिसार मंदाग्नी वगैरे रोग उत्पनन झाले आहेत. त्यांची यावरील प्रीती कमी होण्याकडे फार उपयोग होईल. यापासून धर्माविषयी सावधानता उत्पन्न होईल. शरीरात हे रोग उत्पनन झाले नसते तर माझी त्यावरील प्रीती कमी झाली नसती व गर्वही कमी झाला नसता. माझ्या डोळ्यावर मोहाचे पटल च्ढ ल्याने मी या देहालाच अजर व अमर मानून राहिलो होतो. पण या रोगाची उत्पत्ती होण्याने मी आता सावध झालो. हे शरीर अजर अमर नव्हे तसेच हे दु:खातून मुक्‍ त करणारे नव्हे हे आता समजले. संसारात सर्व दु:खातून सोडविण्यास फक्‍ त ज्ञान-दर्शन-चारित्र तप हेच समर्त ाहे. त्याला शरण गेले पाहिजे व चार आराधनांना धारण करणाऱ्या भगवान परमेष्ठीला हृदयात धारण करण केले पाहिजे. यावेळी मला फक्‍ त जिनेश्वराचे वचन हेच कोणी एक अमृ त्याचेच पान करणे अवश्य आहे. जिनवचनामृताशिवाय कषायरू प रोगजनित दाह नाहीसा होणार नाही. बाह्य औषधादिक उपचार असाताकर्माचा उदय मंद असता थोडा वेळ रोगाचा उपशम करू  शकतात. शरीर हे अनेक रोगांनी भरलेले आहे. कदाचित एक रोग क्षणभर शमला तरी दुसऱ्या रोगाची वेदना दुसऱ्या क्षणी चालू होऊन ती भोगून मिरावे लागणार. म्हणून जन्मजरामरणरू प रोगाला नाहीसे करणाऱ्या भगवंताच्या उपदेशरू प अमृताचे पान अशा समी करणे हेच युक्‍ त आहे. औषधादिक हजारो बाह्य उपचार करीत असूनही या विनाशिक देहातील रोग मिटतोच असे दिसून येत नाही. रोगापासून उत्पनन होणाऱ्या वेदनांनी व्याकुळ होऊन कुगतीला नेणारे दुर्ध्यान करू  नये. रोग आला असता मोठा हर्ष मानावा. कारण त्याच्या प्रभावानेच अशा जीर्ण झालेल्या देहापासून आत्म्याची सुटका होणार आहे. तो न येता तर पूर्वकर्माची निर्जरा झाली नसती. देहरू पी महान दुर्गंधी व दु:खदायी कारागृहातून या आत्म्याची लवकर मुक्‍ त्ता झ ाली नसती. या रोगरू पी मित्राचे सहाय्य जसजसे शरीराला अधिकाधिक होत ओ तसतसे रागद्वेषादिक कर्मबंधनापासून शरीराची लवकर सुटका होत आहे. रोग हे शरीरात आहेत व ते त्याला नष्ट करतील. मी अमूर्तिक, चैतन्यस्वभावी, अविनाशी, ज्ञाता आहे. मला या रोगदिकापासून होणारे दु:ख समजते, म्हणून मी फक्‍ त त्याचा जाणणार आहे. शरीराबरोबर माझाही थोडाच नाश होणार आहे( लोखंडाच्या संगतीमुले अग्नीला देखील घणाचे आघात सोसावे लागतात, तसे शरीराच्या संगतीने मला वेदनेचे ज्ञान होते. अग्नीने झोपडी जळून जाते पण त्या झोपडीतील आकाश जळून जात नाही. तसेच अविनाशी, अमूर्तिक, चैतन्यमयी आत्मा रोगरू पी अग्नीचे नष्ट होत नाही. मी आजपर्यंत जी कर्मे केलेली आहेत त्यांचे फल तर भोगावे लागणारच. या समयी घाबरू न गेलो म्हणून कर्म थोडेच सोडणार आहे( अशा स्थितीत धैर्य धारण करू न आलेल्या कर्माचे भल भोगी तर इहपरलोकाचा बिघाड होणार नाही, म्हणून भित्रेपणा सोडून धैर्य धारण करणे हेच योग्य आहे.

हे आत्मन्( रोग वैरे प्राप्त झाले असता तू इतका भीत ाहेस पण तू नरकात कोणकोणती दु:खे बोगलीनाहीत( असंक्‍ ग्रा नव्हे अनंत वेळी तुझे मारू , चिरू न, फाडून तुकडे केलेआहेत. त्या अपेक्षोने एयेथे किती दु:ख आहे. अरे तिर्यंचयोनीत तू जे दु:ख सोसले आहे ते एक सर्वज्ञच जाणीत असतील. या

रोगानेच तुला आराधननायुक्त मरण करण्याविषयी प्ररेणा केली म्हणून हाच तुझा खरा मित्र समजला पाहिजे((. याप्रमाणे विचार करणारा ज्ञानी पुरष रोग उत्पन्न झाला म्हणून आनंद मानतो.

ज्ञानियोमृतसंगाय मृत्यूस्तापकरोपि सन् ।
आमकुम्भस्य लोकेस्मिन्भवेत्पाकिवधिर्यथा ।। १३ ।।

अर्थ - मृत्यू प्राप्त झाला असता सर्व लोकांना अतिशय दु:ख वाटते, तथापि सम्यग्ज्ञानी पुरषांना तो अमृत म्हणजे मोक्षाजी संगती प्राप्त करू न देणारआहे. कच्चा समातीची घागर अग्नीत तापिवण्याचा हेतू त्यात पाणी भरता यावे हाच आहे. जर ती तापविली नाही तर त्यात पाणी भरले जात नाही. तिला एक वेळा अग्निसंकार दिला की, कतपुष्कळ पाणी भरण्यच्या उपयोगी होते. याप्रमाणे मूत्यूच्या प्रसंगी होणारे दु:ख शांतभावाने एकदा सहन केले तर तो पुरुष मोक्षाला पात्र बनतो.

भावार्थ - अज्ञानी पुरुषाजवळ मृत्यूचे नांव कढले की त्याला भयंकर दु:ख होते. त्याला वाटते आता आपण खरोखर मरणार. मग मागे पुढे आपले कसे होईल( याप्रकारे अनेक संकल्पिवकल्पांनी त्याचे अंत:करण करपून जाते. कारण त्याच्या मनात बाह्य पदार्थाविषयी आत्मबुध्दी जागृत असते तशी सम्यग्दष्टी पुरुषाला नसते. तो शरीर हे आुष्यय व कर्माच्या निमित्ताने उत्पन्न होते व त्याची स्थिती संपताच हे नाहीसे होते असे समजत असतो. आत्म्याचा स्वभाव ज्ञान असल्याने एक देह सोडून सुसरा देह धारण करम्यात आत्म्याचा नाश होत नाही. असा त्याचा पक्का विशवास असतो.

सल्लेखनेचे प्रकार

सल्लेखनेचे दोन प्रकार आहेत. एक कायसललेखना, दुसरी कषायसल्लेखना. सल्लेखना याचा अर्थ उत्तम तऱ्हेने कृश करणे असा आहे. यातून ज्यावेळी शरीर कृश केले जाते, त्यावेळी त्यास कायसल्लेखना म्हणतात. शरीराला जसजसे पुष्ट करीत जावे तसतसें इंद्रियांचे लालसा तीव्र होत जाऊन आत्मशुध्दीच्या मार्गाकडे साहजिक अप्रीती उत्पन्न होते. कामक्रोधलोभ वगैरे विकार शरीराच्या पुष्टतेबरोबर वढत जातात. याचप्रमाणे निद्रा, आळस, प्रमाद वगैरे वढून संकटकाली प्राप्त होणारा उपसर्ग सहन करमअयाची ताकद राहात नाही. कोणत्याही

पदार्थाचा त्याग करू न आत्संयमन होत नाही. अर्थात् यासर्व क्रियांनी आत्म्याला दुर्गती प्राप्त होते. एव्हढ्यानेच पूर्णता होती तरी बरे झाले असते. परुं शरीराच्या वृध्दीबरोबर अनेक प्रकारच्या वातिपत्तकफात्मक व्याधी उत्पन्न होऊन त्यापासून येणार्या दु:खात धुर्ध्यान घडते. म्हणून अननशानादिक बाह्य तपश्चरणांनी शरीरराला कृश करावे, म्हणजे रोगापासून उत्पन्न होणार्या वेदना भोगाव्या लागणार नाहीत व परिणाम बिघडण्याची भीती राहणार नाही. याकरिता पिहल्यांदा कायसल्लेखनेचे स्वरू प सांगतात.

कायसल्लेखना

आहारं परिहाप्य क्रमशछ स्निग्धं विवर्धयेत्पनम् ।
स्निग्धं च हापयित्वा खरपानं पूरयेत् क्रयश: ।। १२७ ।।
खरपानहापनामपि कृत्वा कृत्वोपवासमपि शक्त्या ।

पंचनमस्कारमनास्तनुं त्यजेत्सर्वयत्नेन ।। १२८ ।।

अन्वयार्थ - (ॎमिशः आहारं परिहाप्य) ॎमिान्ने आहार मिी रीत जाऊ (स्निर्धि पान्नं) दूध, दही, तािहे स्निर्धि पदार्थ (विवर्धयेत्) अधिि घ्यावेत. (स्निर्धि च हापयित्वा) पुढे स्निर्धि पेय पदार्थ सोडून्न (ॎमिशः ारिंपान्नं पूरयेत्) िजी, ार्िम पाािर्ॎमिशः घेत जावे. (ारिंपान्नहापन्नाम् अपि ृत्विा) पुढे ार्िम पाािर्िही सोडून्न (शक्त्या) शक्त्यन्नुसार (उपवासं ृत्विा) उपोषिार्िरि न्न (पंचन्नमसिरिमन्नाः पंचन्नमसिराचा मन्नात जप रीत (सर्वयत्नेन्न) प्रयत्न्नपूवर्वि (तन्नुं) शरीराचा (त्यजेत्) त्यािार्िरावा.**विशेषार्थ - कायसल्लेखना करणे झाल्यास ती या अनुक्रमाने करावी. प्रथमतः आपल्या आयुष्याचे मान पहावे. नंतर आयुष्यच्या प्रमाणे शरीर आणि इंद्रिये यावरील प्रेम कमी करावयास लागावे. पुढे आहारावरील ममत्व कमी करून विचार करण्यास प्रारंभ करवा की, हे आत्मन्( संसारात परिभ्रमण करीत असता तू इतका आहार ग्रहम केला आहेस की, एकेक जन्मातील एकेक कण घेतला व तो एकत्र केला तर त्याचा मेरूपर्वताएवढा ढीग हहोईल. अनंत जन्मात इतके पाणी प्याला आहेस की प्रत्येक जन्मातील एकेक बिंदू एकत्र केला तर अनंत समुद्र भरून जातील इतके या सर्व आहारपाण्याने तरी तृप्ती कोठे झाली आहे( मग आता तर रोग म्हातारपणे वगैरे सर्व गोष्टी जमून येऊन मरण जवळ येऊन ठेपले. यावेळी थोडासा आहार घेतला म्हमून तृप्ती थोडीच होणार आहे( या पर्यायात जन्म घेतल्यापासून तू आजपावेतो नित्य आहार ग्रहण करीत आहेस. आहाराच्या लोभामुळेच मोठीमोठी पापे घडतील अशी कृत्ये, हिंसा, असत्य, परधनलालसा, व्यभिचार आणि अप्रमाम-परिग्रह पंचमहापापे, दुर्ध्यान व अनेक प्रकारची कुकर्मे तू उपर्जन केली. आहाराच्या तीव्र वेदनेमुळेच दीनवृत्ती पत्करून पराधीन करून घेतलेस. आहाराच्या लोभाने भक्ष्याभक्ष्य विचार मनात आणला नाहीस रात्रिदिवसाचा किंवा यग्ययोग्यतेचा विचार अधाशीपणामुळे तू केला नाहीस. क्रोध, मान, कपट, लोभ, याचना पण यामुळेच पत्करावी लागली. पोटाच्य मागे लागल्यानेच स्वाभिमान गमाविलास आहाराच्या लोभामुळेच मोठमठ्या रोगंच्य वेदना सोशिल्ास. आहाराच्या लोभानेच जातिहीन व नीच कुलोत्पन्नाची सेवा केली. स्त्री-पुत्राच्या मगे लागल्यानेच स्वाभिमान गमाविलास.. आहाराच्य लोभामुळेच मोठमोठ्या रोगांच्या वदना सोशिल्ास आहाराच्य लोभानेच जातिहीन व नीच कुलोत्पन्नाची सवा कीली. स्त्री-पुत्राच्या सवाधीन होऊन राहिल्यास निर्जज्जपणा पत्करून आचारिवचारांना तिलांजली दिली. आहाराच्या तीव्र इचछेमुळेच तुझ्या देहाचेकापून तुकड तुकडे केले गेले. अनेक प्रकारी दुर्वचने सहन केली. तिर्यंचयोनीत या आरहाराचयाच लोभामुळे परस्पर परस्परांना मारून भक्षण करतात. फार काय सांगावे.आता तुला फारच थोडा वेळ या पर्ययात रहावयाचे ाहे. त्यअर्थी तू या आहारवरील आसक्ती सोड. इंद्रीयांची इच्छा पूर्ण करम्यच्ा भरीस पडू नकोस यावेळी जर आहाराचया त्याग ककरण्याच तू प्रत्यन्न करणार नीस तर व्रत, संयम, धर्म, तप, कीर्ती या सर्वांचा भिघाड होऊन कुमरण प्राप्त होईल व त्यामुळे अनंतकाल संसारपरिभर्मण करावे लगेल. हे फक्त मनात बाळगून अतृप्ती उत्पन्न करणारा आहार क्रमाने सोडता यावा म्हणून कधी एक उपोषण, कधी दोन उपोषणे कधी तीन उपोषणे, कधी एक वेळ आहार, कधी नीरस आहार, कधी अल्पाहार या क्रमे आपली शक्ती पाहून आयुर्मर्यादप्रमाणे व्रते करीत जा.**

हळू हळू आहार सोडून दूध पिऊन राहण्याचा प्रयत्न करावा. दूध पिण्याची सवय झालयनंतर तिचाही क्रमने त्याग करण्याकरिता कधी ताक, कधी ऊन पाणी प्यावे. पुढे क्रमने संपूर्ण आहार,

जलाचाही त्याग करून उपोषम धारम करावे व अंत:करणात पंचनमस्कारमंत्राचे

पेयपदार्थ दूध ध्यान करीत धर्मध्यनात लीन होऊन मोठ्य सावधानतेने देह तयाग करावा. वगैरे घ्यावे.

याला कायसल्लेखना म्हणतात.

शंका - वर सांगितलेल्या क्रमाने आहाराचा त्याग व शेवटी पूर्ण त्याग केल्याने आत्मघात केल्यासारखे होते. आत्मघात करणे हे पाप आहे असे म्हणतात हे कसे(

समाधान - ज्याला सुखोपभोग सोडून पुष्कळ दिवसपर्यंत मुनिपणा, श्रावकपणा, महाव्रते, अणुव्रते वगैरे पालन करम्याचे सामर्थ्य असेल, ज्याला स्वाध्याय, ध्यान, शील, तप, व्रत, उपोषणे वगैरे होत असतील,

ज्याला जिनपूजन, स्वाध्याय, धर्मोपदेश, धर्मश्रवम, चार आराधनांचे चिंतन वगैरे

कायसल्लेखना उत्तम रीतीने निर्विध्नपणे साधता येत असतील, ज्याला दुष्काळादिकांचे भय हा अपघात

नव्हे. प्राप्त झाले नसेल, ज्याच्या शरीरात असाध् रोग उत्पन्न झाला नसेल,

स्मरणशक्ती, ज्ञानवगैरेना नष्ट करणारे म्हातारपण ज्याला प्राप्त झाले नसेल, दशालक्षणिक धर्म पाळण्याची शरीरात ताकत असेल, त्याने आहाराचा त्याग करून सलोखना धारण करू नये. शरीराने धर्मसाधन हत असूनही जो अन्नपाणी सोडून मरण ओढून घेतो तो धर्मपराङ्मुख होतो. मनुष्यपर्यायत व्रत, शील, संयम, वगैरे साधने मोक्ष प्राप्त करून घेण्यासाठी उपलब्ध झाली असूनही शरीरावर वैतागून, आयुष्य असताना जो धर्मसेवानापासून पराङ्मुख होऊन आहाराचा त्यग करतो त्याला आत्मघात घडतो. कारण, शरीर हे धर्माचे परमसाधन आहे. त्याचे संरक्षण काळजीपूर्वक कले पाहिजे, अशी भगवंताची आज्ञा आहे. धर्माचे साधनरूप शरीराला जर अन्नपाणी न देता मरून टाकले, तर पुढे देवनरकितर्यच यातून कोणत्याही योनीत याची प्राप्ती होणार नाी. देवनरकतिर्यच योनीत शरीर प्राप्त झाले तरी ते संयम, व्रत, शील, धर्म साध्य करून घेण्यास उपयगी पडेल अशी त्याची रचना नाही. ती अनुकूलता फक्त मनुष्यशरीरामध्येच आहे. अशा स्थितीत शरीराचे योग्य रीतीने पोषण न करता ते विनाकारण आहाराषिवाय नाहीसे करून टाकले तर त्यात कोणतीही कार्यसिध्दी होणारनाही. हे शरीर गेले तर पुन: ज्यात व्रतधर्म साधता येणार नाही असे दुसरे प्राप्त होईल, महणून धर्मसाधन न करता शरीराचा नाश करू नये.

अनंतानंत शरीरे धारण करिवण्यास कारणीभूत असे जे कर्ममय शरीर (कार्मण देह) त्याला व मिथ्यात्व, असंयम, कषाय वगैरे विकारांना आधी नाहीसे केले पाहिजे. आहारादिकांचे त्याग केलयने हाडामांसाने भरलेला हा औदारिक देह नाहीसा होईल, पण पुन: दुसरा प्राप्त होईलच. त्यऐवजी अष्टकर्मरूप देहाचा नाश केला तर जन्ममरणापासून सुटका होईल. म्हणून तो कर्ममय देह अगोदर नाहीसा करावा व व्रत, तप, संयमदिकात दृढता धारण करून आत्म्याच कल्याण करावे. जयावेळी हे शरीर धर्मपालन करण्यास असमर्थ आहे असे दिसून यींल तयावेळी त्यावरील प्रेम सोडावे. कारण नाशवंत पदार्थावरील प्रेम करण्यात काही तथ्य नाही.

याप्रमाणे कायसल्लेखना कशी व कोमत्या तऱ्हेने करावी हे सांगितले. याचप्रमाणे रागद्वेषमोहादिक कषायांनाही शरीराबरोबर कृश करणे याला कषायसल्लेखना म्हणतात. कषायासल्लेखना करता आल्याशिवय अथवा केलयाशिवा कायसल्लेखना कमे व्यर्थ आहे. शरीर कृश करणे हे रोगी, दरिद्री व पराधीन पुरुषांना देखील साध्य आहे. यात मोठासा पुरुषार्थ नाही. शरीर कृश करीत असता त्याबरोबरच रागद्वेषमोहादिकांना कृश करीत जामे म्हणज हे किार अनंत:करणात ुत्पन्न होऊ न देणे यातच खरा पुरुषार्थ आहे. हा पुरुषाथ जे साधता ते व इहपरलोकसंबंधी सर्व इच्छांच्या अभाव व मरणकाली शरीर, कुटुंब, परिग्रहादिक संपूर्म पदार्थवरील ममतव नाहीसे करतात व वीतरागभावाने संयम धारण करून मरण प्राप्त करून घेतात. हीच खरी कषायसलेखना म्हणावी.

विषयकषायांना जिकणारा असेल त्यालाच समाधिमरण साधण्याची योग्यता आहे. ज विषयासक्त व कषायाधीन आहे त्याला कधीही ती प्राप्त होणार नाही. संसारी जीवांमध्ये विषय आणि कषाय हेच मुख्यत्वेकरून वास कीतसतात. अचाट सामर्थ्य धारण करणाऱ्या पराक्रमी पुरुषांना देखील यांना जिंकता येत नाह. या विषयकषायांनी आज पर्यंत या पृथ्वीवर अतुलबल धारण करणाऱ्या पराक्रमी पुरुषांना देखील यंना जिंकता येत नाही. या विषकषायांनी आजपर्यंत या पृथ्वीवर अतुलबल धारम करणाऱ्या बलभद्र, नारायम चक्रवर्ती पुरुषांना दुर्बल करून ठेवले आहे व सर्वांना आपलय अंकित करून ठेवले आहे. हे दोन महान बलिष्ट आहेत. संसारातील यच्चयावत दु:ख विषलंपटी, लोभी व अभिमानी पुरुषांना प्राप्त होतात. कित्येक जीव जिनदीक्षा धारण करून विषयांच्या संतापाने त्यापासून भ्रष्ट होतात. त्याचा अभिमान व लोभ सुटत नाही अनादिकालापासून या विषयांची वासना चालत आली असलयने त्यापासून क्षणमात्रही त्यांना पराङ्मुख होणे अतिशय दु:दायक वाटते. वरचेवर कषायांची प्रज्वलता वाढत जो. त्यामुळे स्वस्वरूपाच विसर पडतो

आत्मस्वरूपाचे व विषयाच्या स्वरूपाचे सविस्तर वर्णन (भगवती आराधना( नामक ग्रंथात केले आहे. तेथून विशेष जिज्ञासूनी पहावे. तो ग्रंथ (शिवायन( नामक आचार्यांनी रचलेला आहे. वीतरागी होऊ इच्छिणाऱ्या पुरुषाला त्या ग्रंथाच्या अवलोकनाने फार फायदा होणार आहे.

भगवती आराधना ग्रंथ अवश्य वाचावा.

समाधिमरणाच्य प्रसंगी जीवाचे कल्याण करणाऱ्या उपदेशरूप अमृताचा सहस्त्र धारांनी वर्षाव करणारा तो ग्रंथ आहे. त्याचा अवश्य स्वाध्याय करावा. येथे त्याच ग्रंथाच्या आधाराने थोड्यात समाधिमरणाचे स्वरूप सांगितले आहे.

सधूंना रत्नत्रयधर्माचे रक्षण करण्यास सहायभूत अशा आचार्यांचा संघ आणि वैयावृत्य करून धर्मोपदेश देणाऱ्या निर्यापक मुनींचा फार मोठा उपयोग आहे. कारण त्यांचे सहाय्य मिळाले तर कर्मांचा जिंकून आराधनेत सावधानचित्त राहता येते. याचप्रमाणे गृहस्थांनाही धर्मवान, धर्मवान

व्रत श्रध्दाळू व ज्ञानवान अशा श्रावकाचे सहाय्य अवनश्य असेल पाहिजे व त्यंना मठा गृहस्थांच श्रावकाने प्रयत्न करून ते मिळिवले पाहिजे. पंचमकलात विषयानुरागी व कषायी जीवों सहवास घ्यावा. संगतीची विपुल असलयाने नेहमी राग, द्वेष, शोक भय उत्पन्न करणाऱ्या आर्तरौद्रध्यानाची उत्पत्ती होणे फार सुलभ झाले आहे. आरण स्त्री, पुत्र मि, बांधवादिक सर्व आपापल्या मतलबात राजी

असल्याने ते दुसऱ्यांना आपणाकरिता पाप करावयास लावून आत्मस्वरू पाची भुरळ पाडतात. सर्व आपापले विषयकषाय पुष्ट करण्यात मग्न झालेले आहेत. महणून धर्मप्रेमी, परोपकारी, वास्तल्य धारण करणारे आणि करू णारसाने ओथंबलेल्य गृहस्थांचा संयोग प्राप्त होणे ही मोठ्य पुण्यसंचयाची गोष्ट आहे. तथापि हरप्रयत्न करू न अशा पुरुषांची संगती प्राप्त करू न घ्यावी.

मोहपाशात गळा अडकावून आपण मोकळे राहणाऱ्या धर्मभ्रष्ट कुटुंबीजनांचा संगम होईल तितक्य या त्वरेने सोडावा. पराधीनपणामुळे जर कुसंगत येऊन मिळाली व तिचा प्रतिकार करणे आपणांस अशक्य य दिसले, तर त्या पुरुषाशी भाषण करण्याचे टाळून मौन धारण करन बसावे. आपलया कर्मानुसार व देशकालानुरू प ापणास जे स्थान राहण्यास प्राप्त झाले असेल त्य ठिकाणी आसन, शयनादिक करावे.नेहमी अंत:करणात जिनसूत्राचे चिंतन करू न परम वीतराग गुरीला शरण जावे.

सिध्दान्ताचा उपदेश दर्मवान गृहस्थाच्या मुखाने श्रवण करावा. व्रत, उपोषणे, संयम ध्यान व भावना यांचे चिंतन करम्याचे सोडू नये. धर्मात्मा जीव स्वत:ची व इतरांची धर्मपुष्टी करम्याची इच्छा बाळगतात व धर्माची प्रभावना व्हावी म्हणून धर्मोपदेश, वैयावृत्य वगैरे क्रिया करण्यात तप्तर असता. याविषयी ते कधीही आळस करीत नहीत. त्याग, व्रत, संयम शुभध्यान व शुभभावना यातच तिरांचे व आपले लक्ष ा लावतात. कदाचित् एखाद्याला असे चितंन करीत असता कर्माच्या तीव्र उदयाने रोग, क्षुधा, तृषा वगैरे परीषह प्राप्त झाले व ते त्यास सहन होत नसल्याने त्यापासून ढळण्याच्य बेतात असला तर त्यास ते धर्मभावनेत सिथर करतात.

कदाचित कोणी रोगवेदनेने व्याकुण होऊन रडू लागला तरी त्यावेळी त्याचा तिरस्कार करू न त्याला मर्मी लागेल असे भाषण न करता मिष्टभाषणांनी संतुष्ट करावे. अगोदरच वेदनेने त्याचे परिणाम चंचल झालेले व त्यात तिरस्काराचे शब्द जर त्याच्या कानी पडले तर त्यात तीव्र मानसिक दु:ख होऊन दुर्ध्यान घडते. तो आपल्या व्रतापासून अढळून उलट वाईट आचरणाकडे प्रवृत् होतो अथवा कधी कधी तर आत्मघात देखील करण्यास तयार होतो. म्हणून आराधक पुरुषांना धिक्कार किंवा तिरस्कार करू नये. उपदेश देणाऱ्याने धैर्य धरू न त्याला मोठ्या प्रेमाने वागवावे. गोड बोलून तयेच अंत:करण आपल्याकडे आकर्षित करू न घ्यावे. सहज रीतीने असा उपदेश करावा की, तो एकताच त्याला सर्व दु:खाची क्षणभर ती विस्मृती व्हावी. नेहमी करू णारसाने भरलेले व ुपकारबुध्दी सिून यईल असेच भाषण मुखावाटे उचचारावे. ते असे -

(हे आराधक पुरुषा( धर्मेच्छु ( सावध ऐस. पूर्व कर्माच्य उदयाने तुला रोगवेदना होत ाहेत. तुला परीषह प्राप्त झाल्यामुळे तीव्र दु:ख होत आहे. तुझे शरीर अतिशय निर्बल झाले आहे. आयुष्य पूर्ण

येण्याची वेळ जवळ आली आहे. त्या अर्थी तू आता घाबरू नकोस. भय सोडून ˎ

रोग्याला असा धैर्य धारम कर. भयभीत झालास अथवा दैन्य धारण केलेस म्हणून असता ˎ उपदेश द्यावा. कर्माला थोडीच दया येणार आहे( तुला प्राप्त झालेले दु:ख कोणासही नाहीसे करता येणार नाही. असता कर्माचा उदय नाहीसा करू न साता कर्माचा उदय आणून देण्यास कोणी इंद्र धरणेंद्र, अहमिंद्र

किंव साक्षात जिनेंन्द्र देखील समर्थ नाही.अस असता विनाकारण ही भीती तू आपलया मनात बाळगली ाहेस ती व्यर्थ आहे. या भित्रेपणामुळे तुझे दोन्ही लोक बिघडून जातील व तुला धर्मपासून पराङ्मुख व्हावे लागेल. त्याऐवजी धैर्य ठेवशील व व्याकुलता न करता आलेले कर्म भोगशील तर पूर्वक्रमाची निर्जरा होऊन नवन कर्म बांधले जाणार नाही.

तू जैनधर्म धारण केला म्हणिवतोस. त्यागी, व्रती परुषामध्ये श्रेष्ठ म्हणून तुझी मान्यता आहे. सर्व लोक तुला मोठा ज्ञानी समजतात. सध्या अस्तित्वात असलेल्या धर्धारक पुरुषात तुझी प्रख्याती ाहे. तू व्रत ग्रहण केल आहेस यथाशक्ति त व्रतसंयमाची प्रतिज्ञा तू धारण केली आहे. आता तू प्रतिज्ञा रोगवेदनेने व्याकुण होऊन मोडी पाहतोस. यामुळे तुझी जगात अपकीर्ती होईल व परलोकही बिघडेल. याशिवा इतर जे तुझे धर्मबंधू व धर्म यावरही अपकीर्तीचा ठपका येईल. तुझे आचरण पाहून दुसरे भोळे लोकही याचप्रमणे संकटसमयी प्रतिज्ञाभग करू पाहतील. ज्याप्रमाणे क्षत्रिय कुलात उत्पन्न झालेला महान सेनापत रणसंग्रमाचय मोठमोठ्य गष्टी सांगून, शत्री समोर येताच घाबरू न पळू लागला तर इतर सैन्याची काय अवस्था होईल( त्यानी सेनापती गेल्यवर कोठवर धैर्य धरो( कदाचित या संकटातून प्रतिज्ञाभंग करू न जगलास तरी यात लोकिनंदा व धिककार सहन करावा लागेल. तरी असे जिणे काय उपयगाचे( याचप्रमाणे प्रथमत: तू त्यासंयमव्रताची प्रतिज्ञा ग्रहण केली व ती आता सोडण्यात तयार झाल्यने तुझी जगात मोठी अपकीर्ती होईल.

याशिवाय अशुभकर्म नाहीस होईल असेही नाही. पुढे याहूनही अधिक दु:ख देणाऱ्या अशुभ कर्माच बंध बांधला जाईल. त्याची असंख्यात कालची मर्यादा असेल व तो पर्यंत याहूनही अधिक दु:ख भोगावे लागेल. यपूर्वी तू, ( मी जैन धर्मचा परमभकत आहे. जिनेंन्द्राची आज्ञा पाल करणे हे माझे कर्तव्य आहे व म्हणून हय व्रताचरणादिक क्रिया मी ग्रहण करणार. जे ज्ञान, आचरण अनंत जन्मात दुर्लभ ते मला वीतराग गुरू च्य प्रसादाने यावेळी प्राप्त झाले आहे ते मी ककसे टाकू(( असा निश्चय केला होतास असे असून आता रोगापासून वेदना होई लागल्यमुळे मन चंचल होई देणे लाजिवरवाणे आहे. ज्य वेदनेचे इतके भय वाटते आहे त्यपासून अखेर काय होणार( मरण प्राप्त हईल एवढेच ना( ते कधी तर एक वेळी येणारच आहे. ज्याने देह धारण केले आहे त्याला मरण आहे अवश्य यावयाचेच. परन्तु य प्रसंगी वीतराग गुरूं नी उपदेशिलेलया व्रससंयमचा भयाने तयग न करात चार आराधनांना शरण जाऊन मरण प्राप्त करू न घेतले यतर यासारखा दुसरा फायदा नाही. त्रैलोक्य याची विभूती जरी एक वेळ प्राप्त झाल तरी तीही नाशवंत असून पराधीन आहे. पम ही आराधनेची वूिती अथवा संपतती अविनाशी असन अनंतसुख करू न देणारी आहे. जे समधिमरम प्राप्त व्हाव महणून मुनी आचार्य उपाध्याय इच्चा करीत असतात व समयग्दष्टी जीवांनाही तस वाटत असते व तुम्हीही पण इचछीत ाहात, ते प्रप्त होण्या काळ नजीक आला तरी याहून श्रेष्ठ आनंद तो कोणता( त्यातून वरचेवर या रोगाच्य वेदना वाढत आहेत ही मोठी कृपाच समजवी. कारण यपासन तुमचे शरीरावरील प्रेम नाहीसे होत जाईल. पूर्वी ज्यात असाता कर्माचा बंध केलेला होता त्याचा थोड्या वेळात नाश होऊन आणि दु:ख व रोगांनी भरलेल्य या शरीररूपी कैदखान्यातून तुमची सुटका हईल. विषयभोगादिकापासून विरक्ती उत्पन्नहोईल, परद्रव्यवरील ममत्व

घटेल, मरणाचे भय राणार नाही. पुत्रमित्रबांधवादिकावरील ममता कमी होील. याप्रमणेअनेक उपकराच्या गोष्टी वेदनेपासून उत्पन्न हतील. वेदनमुळे भयभीत झालात तरी त्यापासून उलट दु:खच वद्द णार, कर्माचा उदय टळणार नाही. मग विनाकरण धैर्य सोडून काय उपयोग( याप्रसंगी धैर्य धारण केले तर कर्म जिंकता येईल.

ज्याला कर्माला जिंकता येईल तोच शूर म्हणविला जाईल. या प्रसंगी तुम्ही रडाल, तडफड कराल, कासावीस व्हाल तर कर्म तुम्हाला तिर्यंचादिक कुगतीला नेऊन पोहोचवील. तेथे अनंत दु:ख भोगावे लागेल. जायगे तुमचे कुल, जाती वआणि धर्म याची कीर्ती वद्द`ल व तुम्हाला दु:ख होणार नाही. असच वर्तन यवेळी तुमही ठेवले पाहिजे. जे शौर्यशील क्षात्रिय कुलात उत्पन्न झाले आहेत. ते रणभूमीवर शत्रूकडून कसाही जोराचा आघात झाला तर तो सहन करतात. शत्रूला वाठ दाखवून रणातून पळून जात नाहीत. प्रसंगी आपला प्राण देखील देतात, पण पाठ दाखवीत नाहीत. याचप्रमाणे परमवीतराग गुरू ला शरण गेल्या शूरपुरुषाने अशुभ कर्माचा प्रहार झाला म्हणून देह सोडावा, पण दैन्य दाखवून अशुभ कर्माला हार जाऊ नये. कित्यक जैन साधूंना दुष्ट वैऱ्यांनी अरण्यामध्ये समाधिस्थ असतना चोहोबाजूंनी अग्नी लावून दिला. त्याप्रसंगी ते साधू त्या अग्नीत अनेक प्रकारचया भोगते झाले त्यावेळी त्यंनी मलात असा विचार आणला की, आपल्यामागे हे कर्माचे ऋण लागले ाहे, त्याचा यावेळी फडशा होत आहे, म्हणून आपण घाबरू न धैर्य सोडू नये. याप्रमणे वचनाला अगोदर अशा वेदना त्यांनी ससलय. पंचपरमगुरुला शरण जाऊन मठ्य धैर्यने त्या वेदना सहन करीत ते अग्नीत जळून भसम झाले, पम भयभीत होऊन व्रताचा त्यग करू न पळून गेले नाहीत. असा आत्मज्ञानाच प्रभाव आहे.

ज्यांने त्या शरीराहून भिन्न, अविनाशी, अखंड, ज्ञानस्वभावीट आत्म्याचा अनुभव घेतला आहे त्यालाच अशी निष्कंप निर्भय वृत्ती प्राप्त होत असते. अज्ञानी परलोक प्राप्त व्हाव एतदर्थ मोठमोठ्या संकटाच्या प्रसंगी धैर्य ठेवतात. कितीही भयंकरवेदना शरीरात होत असल्या तरी तया जुमानीत नाहीत. मग तुम्ही तर संसारातील सर्व दु:खाचा नाश व्हावा म्हणून जैनधर्म धारण केला आहे. तुम्हाला भय बाळगून आपल्या आत्म्याचे अकल्याण करू न, जागत अपकीर्तीला पात्र होऊन, दुर्गतीला पात्र कसे होता येईल( यचा विचार करू न आता सावध व्हाव. धर्मला शरण जाून कर्मजनित वेदनेला जिंका. अस प्रसंग पुन: अनंत जन्मात कधी प्रपात् होणार नाही सध्या तुमची नाव तीराला लागलेली आहे अस समजा. यावेळी यातून उतरण्याा आळस कराव तर ती संसारसमुद्रात बुडून जाईल, सर्व आयुष्यभर मोठमठे ग्रंथ वाचून जे ज्ञान आजवर संपादन केले, आपल विचार निर्मल कले, तप त्याग , निय धारण कले ते सर्व हा प्रसंग व्हावा म्हणूनच . आता तो प्रसंग प्राप्त झाला असता वेदनेने घाबरे होऊन भ्रष्ट व्हाल तररोग किंवा वेदना नाहीशा होणार नाहीत. मरण हे तर टळणार नाहीच. मग आपलया आत्म्याला दुर्गतिरू प अंधकूपात विनाकारण क बुडविता (

ज्यावेळी देशात एखाद्या रोगाची साथ उत्पन्न होते, भयंकर दुष्काळ पडतो, क वचित प्रसंगी एखाद्या निर्जन करण्यात आपला चुकून प्रवेश होतो, कधी अनिवर्य सकट प्राप्त होते, भयंकर
रोग शरीरात उत्पन्न होतो, त्यावेळी उत्तम कुलात उत्पन्न झालेले लोक दुर्धर

रोगात सन्यास सन्यास-मरण करण्यास उद्युक्त होतात. हवेचा उपद्रव शहरात सुरू झाला घ्यावा.

असता त्याचे आपणाला भय वाटू नये म्हणून दारू पिणे, दुर्भिक्ष प्राप्त झाले असत अन्नाच्य अभावी मांस भक्षणास तयार होणे, कंदमूल वगैरे अभक्षय पदार्थ भक्षण करणे, कोणी जबरदस्ती केली असता भिऊन धर्मांतर करणे, हिंसादिक पंचमहापापासारखी कुकर्मे करणे वगरे प्रकारचे आचरण करू नये. असे आचरण नीच पुरुषांनीच करणे यग्य आहे. जैन धर्मानुयायी श्रावकाने रोगादिकापासून तीव्र वेदना होत असतना देखील आपलया विचारात फेर पडू देऊ नये. अनंतकालपर्यंत ग्रहण केलेला धर्म, व्रत,त्याग नियम हे नि:संशय यथाविधि पाळले जातीलच असा मनाचा पक्का निश्चय ठेवावा. मरणकाली देखील आपले विचार पवित्र राहिले,आचरणात, ज्ञानात फरक पडला नाही असे सर्व लोकास आपलय कृतीवरून दिसून आले, तर तुमची जगात खरी कीर्ती होईल. अशा निर्मल क्रियेपासून उच्च अशा देवकुलात जन्म होईल. ज्याने अनेक प्राणविघातक संकटप्रसंगी आपल विचार बदलले नाही, आचरणात दोष येऊ दिला नाही, उलट मेरू पर्वताप्रमामे निश्चल वृत्ती धारण कले किंवा समुद्राप्रमाणे गंभीरता धरली त्यांचीच जगातील उत्म पुरुषात गणना होते. म्हमून समाधिकरण साधू इच्छिणाऱ्यांना आचार्यांनी निक्षून संगितले आहे की, (तुम्ही रोगवेदनेने व्याकुळ होऊ नका. या शरीराहून आत्मा अत्यंत भिन्न आहे त्याच्या ज्ञानस्वभावाचे सम्रण करा. तीव्र वेदनेचया व्यथा होऊ लागल्या असता पूर्वी होऊ गलेल्या धर्मवन पुरुषांनी धैर्य धारण करून कसे आचरण ठेवले होते त्याचा विचार मनात आणा(.

पूर्वी अनेक साधूंना, मुनींना, सिंह वाघ वगैरे दुष्ट व क्रूर सिध्दान्ताचा उपदेश दर्मवान गृहस्थाच्या मुखाने श्रवण करावा. व्रत, उपोषणे, संयम ध्यान व भावना यांचे चिंतन करम्याचे सोडू नये.

**पूर्वकालीन महात्मयांची उदाहरणे**

धर्मात्मा जीव स्वत:ची व इतरांची धर्मपुष्टी करम्याची इच्छा बाळगतात व धर्माची प्रभावना व्हावी म्हणून धर्मोपदेश, वैयावृत्य वगैरे क्रिया करण्यात तप्तर असता. याविषयी ते कधीही आळस करीत नहीत.

त्याग, व्रत, संयम शुभध्यान व शुभभावना यातच तिरांचे व आपले लक्ष लावतात. कदाचित् एखाद्याला असे चितंन करीत असता कर्माच्या तीव्र उदयाने रोग, क्षुधा, तृषा वगैरे परीषह प्राप्त झाले व ते त्यास सहन होत नसल्याने त्यापासूनढळण्याच्य बेतात असला तर त्यास ते धर्मभावनेत स्थिर करतात.

सुकोशल स्वामीला त्यांच्या आईचा जीव जो वाघीण होऊन जन्मला होता, त्यांने भक्षण केला असता ते आपल्या व्रतापासूनढळले नाहीत. त्यापुढे तुमच्या दु:ख वेदना किती दु:सह असतील(

गजकुमार स्वामीला त्यांच्या शत्रींनी सर्वांगात खिळे ठोकले तरी ते आपलया व्रतापासून ढळले नाहीत, त्याहून तुम्हास वेदना जास्त होत आहेत काय(

सन्तकुमार नामक मुनीच्या शरीरात खोकला, ज्वर, शोष, क्षुधेची तीव्र वेदना, ओकारी, नेत्रशूल, उदर वगैरे अनेक रोग उत्पन्न झाले. त्यांची वेदना तयांनी शंभर वरपर्यंत साम्यभावाने सोसली, पण धैर्य सोडून घेतलेल्या व्रतापासून डगमगले नाहीत. त्याहूनही तुम्हाला अधिक वेदना होत आहेत काय(

भद्रबाहु मुनींना तीव्र क्षुधेची व्याधी जडली. त्यांनी अवमोदर्य तपाची प्रतिज्ञा केली होती. क्षुधेचे दु:ख होत असून ते आपल्या आराधनेपासून रतिमात्र ढळले नाहीत. त्यापुढे तुमच्या वेदना कितीशा असतील(

ललितघटा नावाने प्रसिध्द असणारे बत्तीस मुनी कौसांबी नदीच्या प्रवाहात वाहून गेले तरी ध्यानच्युत झाले नाहीत.

चंपानगरीच्या बाहेरच्या बाजूला असणाऱ्या गंगानदीच्या तीरावर धर्मघोष मुनींनी एक महिन्याचाय उपोषणाची प्रतिज्ञा केली होती. त्यांचे क्षुधेच्या तीव्र वेदनेनेप्राणोत्क्रमण झाले पण त्यांनी व्रतभंग केला नाही. त्यापुढे तुमच्या वेदना कितीशा होतील(

श्रीदत्त मुनींना पूर्वजन्मीच्या वैरामुळे एका देवाने विक्रिययाऋ:ध्दीने भयंकर शीत वेदना दिली, तरी ते मुनी न डगमगता आपले ध्यान न सोडता निश्चल राहिले, त्यामुळे मोक्षाला गेले.

वृषभसेन मुनींना उन्हाने तापलेल्या दगडावर बसून उष्णवायूंच्या लहरींनी व प्रखर सूर्य किरणांनी अतिशय त्रास झाला. तरी त्यामुळे त्यांनी आपली आराधना सोडली नाही.

रोहेड नामक शहरात अग्निराजाच्या कार्तिकेय पुत्राला क्रौंच नामक त्यांच्या शत्रूंनी शस्त्रांनी मारले, त्यावेळी त्यांने कायोत्सर्ग ध्यान धरून त्या वेदना अत्यंत शांसभावाने सोसल्या.

काकंदी शहरातील अभयघोष नामक मुनीच्या शरीराचे चंडवेग नामक वैऱ्याने तुकडे केले, तरी त्या वेदनेमुळे ते भयभीत होऊन आराधना सोडण्यास उद्युक्त झाले नाहीत म्हणून मुक्तीला गेले.

विद्युच्चर नामक चोराला तपश्चरणाच्या वेळी डास आणि मच्छरांनी सर्वांगाला भयंकर दंश केला तरी दु:खाने कातर होऊन त्यांनी ध्यान सोडले नाही म्हणून त्यांची सद्‌गती झाली.

सुकोशल स्वामीला त्यांच्या आईचा जीव जो वाघीण होऊन जन्मला होता, त्यांने भक्षण केला असता ते आपल्या व्रतापासूनढळले नाहीत. त्यापुढे तुमच्या दु:ख वेदना किती दु:सह असतील(

चिलातिपुत्र नामक मुनीला त्यांच्या शत्रुनी सर्वांगात खिळे ठोकले तरी ते आपलया व्रतापासून ढळले नाहीत, त्याहून तुम्हास वेदना जास्त होत आहेत काय(

कुंभकारकट नामक मुनीच्या शरीरात खोकला, ज्वर, शोष, क्षुधेची तीव्र वेदना, ओकारी, नेत्रशूल, उदर वगैरे अनेक रोग उत्पन्न झाले. त्यांची वेदना तयांनी शंभर वरपर्यंत साम्यभावाने सोसली, पण धैर्य सोडून घेतलेल्या व्रतापासून डगमगले नाहीत. त्याहूनही तुम्हाला अधिक वेदना होत आहेत काय(

चाणक्य मुनींना तीव्र क्षुधेची व्याधी जडली. त्यांनी अवमोदर्य तपाची प्रतिज्ञा केली होती. क्षुधेचे दु:ख होत असून ते आपल्या आराधनेपासून रतिमात्र ढळले नाहीत. त्यापुढे तुमच्या वेदना कितीशा असतील(

कुकाला नामक एका गावच्या बाह्य वनामध्ये वृषभसेनादि मुनी आपल्या संघासह उतरले होते. त्या वनाला रिष्टाम नामक कोणी दुष्ट शत्रूने आग लावली व त्यामुळे तसर्व मुनी दग्ध झाले पण आपलया व्रतापासूनढळले नाही.

सारांश - याप्रमाणे अनेक भयंकर वेदना आजपर्यंत मोठमोठ्या वीरपुरुषांनी सोसल्या आहेत. त्यांची उदाहरणे तुम्हास ग्रंथातून दाखविता येतील. त्या सर्वाहून तुम्हास ज्या वेदना होत आहेत, त्या कितीशा अधिक असतील( यावरून समाधिमरण साधू इच्छिणाऱ्यांना बोध घेण्यासारखा आहे.

वरील वर्णिलेले सर्व मूनी ज्यांना कोणीही सहाय्य नव्हते, ते एकटे असून त्यांनी आलेल्या संकटापासून परावृत्त होण्याचा विचारही मनात आणला नाही. त्यांचे दु:खख दूर व्हावे म्हमून कोणी प्रयत्न करण्यासही जवळ नव्हते तशा प्रसंगी आहाराच्य लोभामुळेच मोठमोठ्या रोगांच्या वदना सोशिल्यास आहाराच्य लोभानेच जातिहीन व नीच कुलोत्पन्नाची सवा कीली. स्त्री-पुत्राच्या सवाधीन होऊन राहिल्यास निर्लज्जपणा पत्करून आचारविचारांना तिलांजली दिली. आहाराच्या तीव्र इचछेमुळेच तुझ्या देहाचेकापून तुकड तुकडे केले गेले. अनेक प्रकारी दुर्वचने सहन केली. तिर्यचयोनीत या आरहाराचयाच लोभामुळे परस्पर परस्परांना मारून भक्षण करतात. फार काय सांगावे.आता तुला फारच थोडा वेळ या पर्ययात रहावयाचे ाहे. त्यअर्थी तू या आहारवरील आसक्ती सोड. इंद्रीयांची इच्छा पूर्ण करम्यच्या भरीस पडू नकोस यावेळी जर आहाराचया त्याग ककरण्याच तू प्रत्यन्न करणार नीस तर व्रत, संयम, धर्म, तप, कीर्ती या सर्वांचा भिघाड होऊन कुमरण प्रप्त होईल व त्यामुळे अनंतकाल संसारपरिभर्मण करावे लगेल. हे पक्के मनात बाळगून अतृप्ती उत्पन्न करणारा आहार क्रमाने सोडता यावा म्हणून कधी एक उपोषण, कधी दोन उपोषणे कधी तीन उपोषणे, कधी एक वेळ आहार, कधी नीरस आहार, कधी अल्पाहार या क्रमे आपली शक्ती पाहून आयुर्मर्यादप्रमाणे त्याकडे तुमही लक्षा लावू नका. सहधर्मीजनांच्या मुखावाटे निघणाऱ्या जिनवाणीरूपी अमृताचे पान करण्याकडे मन वळवा महमज तयापासून वेदनारूपी विषाचे शमन होऊन मनास शांती प्राप्त होैल, परिणाम निर्मळ होतील, धर्मिवषयी उत्साह उत्पन्न होईल, पापाची निर्जरा होईल व भय वाटणार नाही.

या उलट वेदना होत असताना तळमळ करून जो पापबंध होणार त्यापासून चतुर्गतीत कोमकोणती दु:खे प्राप्त होतील याचा विचार करा म्हणजे तुमच्या लक्षात येईल की, संसारात परिभ्रमण करीत असता जीवाला कोणत्या वेदना प्राप्त झाल्यावाचून राहिल्या नरकतिर्यंच

गतीततील करा. आहेत( अनेक वेळा क्षुधा, तृषा, वेदनेने व्याकुळ होऊन मरावे लागले. वेदनेचे स्मरण अनेक वेळा अग्नीत दग्ध होऊन, पाण्या बुडून विषभक्षण करून सिंह, व्याघ्र, सर्पादिक दुष्ट पशूंच्या भक्षायस्थानी पडून, पर्वताच्य अत्युच्य् शिखरावरून पडून व

स्त्रघातांनी मरावे लागले आहे. आता कितीसे दु:ख( याही पेक्षा निकतिर्याचीगतीमध्ये जे दु:ख भोगले आहे त्याची अवस्था फक्त शरीराने धर्मसाधन हत असूनही जो अन्नपाणी सोडून मरण ओढून घेतो तो धर्मपराङ्मुख होतो. मनुष्यपर्यायत व्रत, शील, संयम, वगैरे साधने मोक्षा प्राप्त करून घेण्यासाठी उपलब्ध झाली असूनही शरीरावर वैतागून, आयुष्य असताना जो धर्मसेवानापासून पराङ्मुख होऊन आहाराचा त्यग करतो त्याला आत्मघात घडतो. कारण, शरीर हे धर्माचे परमसाधन आहे. त्ाचे संरक्षण काळजीपूर्वक कले पाहिजे, अशी भगवंताची आज्ञा आहे. धर्माचे साधनरूप शरीराला जर अन्नपाणी न देता मरून टाकले, तर पुढे देवनरकितर्यच यातून कोणत्याही योनीत याची प्राप्ती होणार नाी. देवनरकतिर्यंच योनीत शरीर प्राप्त झाले तरी ते संयम, व्रत, शील, धर्म साध्य करून घेण्यास उपयगी पडेल अशी त्याची रचना नाही. ती अनुकूलता फक्त मनुष्यशरीरामध्येच आहे. अशा स्थितीत शरीराचे योग्य रीतीने पोषण न करता ते विनाकारण आहाराषिवाय नाहीसे करून टाकले तर त्यात कोणतीही कार्यसिध्दी होणारनाही. हे शरीर गेले तर पुन: ज्यात व्रतधर्म साधता येणार नाही असे दुसरे प्राप्त होईल, महणून धर्मसाधन न करता शरीराचा नाश करू नये. सुख दु:खाच्या वेदना तर सोसल्याच पाहिजेत, वेदेनेने चिडून तुम्ही अपघाताला प्रवृत्त व्हाल तर नरकात याहून अनंतपट व असंख्यात कालपर्यंत त्या सोसावय लागतील.

नारकी जीवाच्या शरीरात पापाचय उदयाने स्वभावत: अनेक रोगांचे वास्तव्य असलेच नरकातील जमिनीचा स्पर्श हाच प्रथमत: कोट्यावधी विंचवांच्या दंशाहून अधिक भयंकर आहे. नारकी जीवांना

क्षुधातृषा इतकी अचाट आहे की, पृथ्वीतील सर्व अन्न भक्षण केले किंवा सर्व

नरकदु:खाची समुद्र प्राशन केले तरी तृप्ती होत नाी. पण अन्नाचा एक कण किंवा पाण्याचा

कल्पना एक थेंब मिळेल तर शपथ( नरकातील पहिल्या पटलातील मातीची तिकी भयंकर दुर्गंधी येते की तयातून एक कण जर मनुष्यलोकात आणला तर अर्धा कोसाच्या आजुबाूचे पंचेद्रिय मनुष्य तिर्यच सर्व मरण पावतील, निरंतर वाहात आसतात. सर्व शरीरावरील केसातून घाण असा गाम नेहमी वाहत असतो ( याप्रमाणे नऊ व्दारांनीही ज्या शरीरातून रात्रंदिवस मल वाहतो असे शरीर स्नानाने शुध्द होते व पवित्र होते असे म्हणता येत नाही. जसे मातीने बनविलेले, मलाने बरलेले, चोहोबाजूंनी मलांनी माखलेलेल मडके वरून पाणी गेलून किती जरी धुतले तरी स्वच्छ होत नाही, त्याप्रमाणे हे सरीरही वरच्या फक्त स्नानाने पिवत्र होत नाही. व्यवहारात ज्या वस्तू अथवा ज्या जागा अशध्द अथवा अपवित्र मानल्या आहेत त्या सर्व या शरीराच्या संबंधानेच अपवित्र जाल्या आहेत. काही ठिकाणी कातडे पडल्यामुळे, कही ठिकाणी केस पडण्याने, काही ठिकाणी उच्छिष्ट पडण्याने, कित्येक वस्तू रक्त, मंस, पू, हाडे, चरबी, मलमूत्र, थुंकी, लाळ, कफ, शेंबूड वगैरेच्ा स्पर्शाने व काही पदार्थ आंघोळीच्य पाण्याचे शितोंडे उडाल्याने अपवित्र होतात असे पाहतो व ऐकतो. यवरून शरीराचया संबंधाशिवाय दुसरी कोणतीही वसतू अशुध्द होत नाी अस दिसून येते. नारक जीवांना मानसिक दु:खही अपार आहे. त्यांचे शरीरात होणारे, क्षेत्रात होणारे व परस्परात असुराकडून उत्पन्न करविले जाणारे दु:ख वाणीने वर्मन करण्यासारखे नाही. नरकात आयुष्य पूर्ण झाल्याशिवाय मरण प्राप्त होत नाही. या सर्व गोष्टींचा विचार मनात आणा.

तिर्यंच आणि मनुष्यांना पापाच्या उदयाने जु दु:ख सोसावे लागते ते तर तुम्हाला प्रत्यक्षात दिसतच आहे. त्याचे वर्णन करण्याची जरूरी नाही. पराधीन अशा पशूंचा दु:ख म्हणजे त्यांना बोलता न येणे, क्षुधा, तृषा, शीत-उष्ण, मारण-ताडन, अतिभारारोपण, नासिकाछेदन, पशूच्या दु:खाची रज्जुबंधन वगैरेपासून होणारे दु:ख भोगावे लागते त्यांना स्वेच्छेने हिंडता, कल्पना फिरता, बसता, उठता येत नाही अथवा कोणालाही दु:ख सांगण्याचा किंवा दाखविण्याचा मार्ग नाही. अमुक याच्य घरी राहीन, अमुक यच्या घरी राहणार नाही हे त्यांच्या स्वाधीन नाही. यदयपि शरीरारत रक्त-मांस-हाड-चर्म-मल-मूत्र वगैरे भरलेले आहेत तरी यंचा बाह्यत: प्रत्यक्ष स्पर्श झाला असता स्नान करणे योग्य आहे. केश शरीरापासून दूर झाले असत ते स्पर्श करण्यास योग्य राहात नाहीत. त्यंचा आपलय हस्ताचा स्पर्श झाला तरी तात्काल हात धुऊन टाकावे. य अशुध्द वस्तूची गलानी मानली नाही तर नीच असे चांडाल, कसाई वगैरे व आपण यत भेद तरी कोणता उरेल( त्यांच्या व आपल्या आचरणात भेद न राहिल्याने सर्व व्यवहारधर्माचा लोप होऊन उत्तम कुल व नीच कुल या दोहोंचे आचार सारखे समजले जातील. व्यवहारिक आचरण बिघडल्याने धर्ममार्ग भ्रष्ट होऊन जाईल. निंद्यकर्म करण्याची लाज नाहीशी झाल्याने कुलपरंपरा बिघडून जाईल व पापाचा बंध पडेल. परमर्थशौच व्यवहारशौचाची शुध्दता असेल तर घडते. जयाच्य भोजनपानस्पर्श व संगती इत्यादी प्रवृत्तीमध्य मलिनपणा असेल त्याचा धर्मही मलिन होतो. जे हिंसा करणारे आहेत म्हमून यांचा स्पर्श करून घेत नाहीत. मुनीश्वर नीच लोकांचा स्पर्श झाला असता दंडस्नान करतात व त्या दिवशी उपोषण करतात. न समजता मुनीश्वरांनी नीच कुलाच्या मनुष्यच्या घरी प्रवेश केला तर त्या दिवशी आपणास भोजनाचा अंतराय झाला असे समजतात. याच प्रमाणे मद्य, मांस अथवा शरीरातून चार बोटे ओघळ जाण्याइतके रक्त वाहात असले अथवा मृतशरीर भोजन करतांना पाहिले तर मुनी अंतराय झाला असे समजून भोजन सोडतात. याप्रमाणे तिर्यंचांना होणारे दु:ख तुम्हाला प्रत्यक्ष दिसत आहे. त्यापुढे तुम्हाला कितीसे दु:ख होत असेल(

आराधक पुरुषाने सल्लेखना करताना त्याचे पाच दोष टाळल पाहिजेत ते असे -

जीवितमरणाशंसे भयमित्रस्मृतिनिदाननामान: ।

सल्लेखनातिचारा: पंच जिनेन्द्रै: समादिष्टा: ।। १२९ ।।

अन्वयार्थ - ( जीवितमरणाशंसे भय-मित्रस्मृति-निदाननामान:) सल्लेखना धारण केल्यानंतरही दोन दिवस आपण अधिक जगलो तर बरे वाटणे हा जीवितशंसा नामक पहिला दोष. मरण लवकर यावे अशी इच्छा करणे हा मरणातिशंसा नांवाचा दुसरा दोष. मरण प्राप्त झाले असता तीव्र दु:ख येते ना( ते मला कसे सहन होईल अशी भीती वाटणे हा तिसरा दोष. मरताना आपल्या इष्टमित्रपुत्रदारादिकांचे स्मरण करणे हा मित्रस्मृति नावाचा चौथा दोष आणि भिवण्तकाली अनुक तपश्चरण मी केलआहे ताचे अनुक फल मला प्राप्त वहावे अशी इच्छा करणे ही निदान नांवाचा पाचवा दष आहे (पंच सल्लेखनातिचारा:) याप्रमाणे हे पाच दोष टाळावे असे (जिनेंद्रै: समिदष्टा:) भगवंतांनी सांगितले आहे.

विशेषार्थ - सल्लेखना मरण साधीत असता सर्व गोष्टींचा त्याग करू न फक्त आपल्या शुध्द ज्ञायक स्वभावाचे अवलंबन करावे. देहादिक सर्व परवस्तूवरील ममत्व सोडून सन्यास धारण केला. तथापि पुन: जगण्याची व मरण्याची इच्छा करणे, भय बाळागणे, मित्रावर प्रेम करणेआणि पुढे अमुक सुख प्रापत व्हो म्हणून इचछा करणे यापासून परिणामात प्रपा्त झालेल उज्जलता नाहीशी होते व पुन: रागद्वेष उत्पन्न होतात म्हणून सल्लेखनेला मलिन करणाऱ्या य दोषांचा त्यग करावा. निर्दोष समाधिमरण प्रापत झाले असता गृहस्थांना स्वर्गात महान ऋध्दिधारक देवपदाची प्राप्ती होते व पुढे क्रमने संयम धारण करू न त्या जीवाला नि:श्रेयस (मोक्ष) प्राप्त करू न घेता येतो.

नि:श्रेयसमभ्युदयं निस्तीरं दुस्तरं सुखम्बुनिधिम् ।

नि:पिबति पीतधर्मा सवैर्दु:खैरनालीढ: ।। १३० ।।

अन्वयार्थ - (पीतधर्मा) धर्ममत प्रशान करणारा सल्लेखनाधारी कोणी जीव स्वर्गातील अहमिंद्रपदाच्य सुखपरंपरेला पुष्कळ काळपर्यंत भोगतो व कोणी (सर्वै: दुखै: अनालीढ:) जीव संपूर्म दु:खापासून मुक्त होत्साता (निस्तरं) अपार सुख (दुस्तरं) तरू न जाण्यास कठीण (सुखाम्बुनिधिं नि:श्रेयसं निष्पिबति) अशा समुद्ररू पी निर्वाणपदाचा अनुभव घेतो.

मोक्षाच लक्षण

जन्मजरामयमरणै: सौकैर्दु:खैर्भयैश्च परिमुकतम् ।

निर्वाणं शुध्दसुखं नि:श्रेयसमिष्यते नित्यम् ।। १३१ ।।

अन्वयार्थ - (जन्मजरामयमरणै: शोकै: दुखै: भयै: च परिमुक्तं) जन्म, वृध्दपणा, रोग, मरण, शोक भय आणि दु:ख ही जेथे नाहीत व (नित्य शुध्दसुखं) उपाधिरहित सुख हेच जेथे नेहमी असते त्याला (निर्वाणं नि:श्रेयसं इष्यते) निर्वाण किंवा नि:श्रेयस म्हणजे मोक्ष असे म्हणतात.

विद्यादर्शनशक्ति-स्वास्थ्यप्रह्लादतृप्तिशुध्दियुज: ।

निरतिशया निरवधयो नि:श्रेयसमावसन्ति सुखम् ।। १३२ ।।

अन्वयार्थ - (विद्यादर्शनशक्ति-स्वास्थ्यप्रह्लादतृप्तिशुध्दियुज:) अनंतज्ञान, अनंतदर्शन, अनंतवीर्य, परमौदासीनता, अनंतसुख, विषयाविषयी निर्वाछकता, द्रव्य भावकर्मरू पी मलाचा अभाव या गुणांनी युक्त असे पुरुष (निरतिशया:) हीनाधिकतारहित (निरवधय:) अनंतकाल पर्यंत (नि:श्रेयसं अवसन्ति) मोक्षस्थानी राहतात.

भावार्थ - धर्माच्या प्रभावाने आत्मा मोक्षास जाऊन राहतो. तेथे केवलज्ञान, केवलदर्शन, अनंतदर्शन, परमवीतरागता, निराकुल सुख, विषयांची अनिच्छा, कर्ममलरहितपणा वगैरे गुण प्रकट

होऊन, या गुणात हीनाधिकता व कालाची मर्यादा राहता नाही. अशा स्थितीत अनंतानंत काल आत्माला रहावयास सापडते हाच मोक्षा होय.

काले कल्पशते(पि च गते शिवानां न विक्रिया लक्ष्या ।

उत्पातो(पि यदि स्यात् त्रिलोकसंभ्रान्तिकरणपटु: ।। १३३ ।।

अन्वयार्थ इ (कल्पशते अपि काले गति) अनंतानंत कल्पकाळ ुलटून गेला तरी देखील (शिवानां) मुक्तजीवांमध्ये कोणताही (विक्रिया न लक्ष्या) विकार म्हणजे त्यांचे अन्यथा स्वरूप होत नाही. (यदि त्रिलोकसंभ्रान्तिकरणपटु: उत्पात: अपि स्यात्) जरी सर्व त्रैलोकयाला हलवून सोडणार असा भयंकर उत्पात झाला तरी त्यामुळे सिध्द जीवामध्य कांहीही गडबड होत नाही.

सिध्दाच स्वरूप

नि:श्रेयसमधिपन्नास्त्रैलोक्यशिखामणिश्रियं दधते ।

निष्किट्टिकालिकाच्छविचामीकरभासुरान्मान: ।। १३४ ।।

अन्वयार्थ - (निष्किट्किालिकाच्छिवचामीकरभासुरात्मान:) सोन्यातील मळ आणि काळिमा अगदी नाहीशी जयामुळे तयचय दैदीप्यमान कांतीसारखे (नि:श्रेयस अधिपन्ना) मोक्षावासी जीव (त्रैलोक्यशिखाणणिश्रियं) त्रैलोक्यातील शिरोभागाचय सर्वोत्कृष्ट शोभेला (दघते) प्राप्त होतात.

पूजार्थाज्ञैश्ययैर्बलपरिजनकामभोगभूयिष्ठै: ।

अतिशयितभुवनमद्भुतमभ्युदयं फलति सध्दर्म: ।। १३५ ।।

अन्वयार्थ - (सध्दर्म:) ह्या सलेखना नामक सध्दर्माने (अतिशयितभुवनं) तीन भुवनात न प्राप्त होणारे अस अतिशयित - विशिष्ट (अद्भूतं अभ्युदयं) अद्भुत इंद्रादि उत्कृष्ट वैभव यांनी युक्त (पूजार्थाज्ञैाश्वर्य: बलपरिजनकामभोगभूयिष्ठै:) सन्मान, द्रव्य, आज्ञा, ऐश्वर्य, शक्ती, नोकर व विपुल कामभोग (फलति) फल प्राप्त होते.

-------------

श्रावकधर्माच्य अकरा प्रतिमांचे स्वरूप

श्रावकपदानि देवैरकादश देशितानि येषु खलु ।

स्वगुणा: पूर्वगुणै: सह संतिष्ठन्ते क्रमविवृध्दा: ।। १३६ ।।

अन्वयार्थ - (देवै:) सर्वज्ञदेवांनी (श्रावकपदानि) श्रावकाच्य पायऱ्या म्हणजे प्रतिमा (एकादश) अकरा (देशितानि) सांगितल्या आहेत. (येषु खलु) ज्या प्रतिमांमध्ये (स्वगुणा:) जे गुण असले पाहिजेत ते

(पूर्वगुणै:सह) पूर्वीच्या प्रतिमेपैकी सर्व गुण क्रमनुसार (संतिष्टन्ते) वद्ध त असतात. तया अकरा प्रतिमा असा - १.दर्शन, २.व्रत, ३.समायिक, ४. प्रषोधोपवास, ५. सचिचत्तत्यागस ६. रात्रिभोजन, ७.ब्रह्मचर्य, ८.आरंभत्याग, ९.परिग्रहतयाग, १०. अनुमतित्याग आणि ११. उददष्ाहारत्याग ह्य होत. जो अनुक्रमाने पुढ ची पायरी धारण करील, त्याला मागच्या पायरीतील सर्व गुणकिऱ्यांचा आवश्यकता आहे. पुढ वची पायरी धारण केली व माग्या पायरीच गुम सोडले अस होता कामा नये. जसे ब्रह्मचर्य प्रतिमा कोणी धारण करील तर त्याला त्यापूर्वीचय सहा प्रतिमेतील आचरण, नियम, क्रिया या सर्व पूर्म पाळल्याच पाहिजेत. तरच तो आठवी प्रतिमा धारण करण्यास योग्य होईल.

## दर्शन प्रतिम

सम्यग्दर्शनशुध्द: संसारशरीरभोगिनर्विण्ण :

पंचगुरुचरणशरणो दर्शनिकस्तत्त्वपथगृह्य: ।। १३७ ।।

अन्वयार्थ - (सम्यग्दर्शनशुध्द:) सम्यग्दर्शनाच्या पंचवीस दोषांनी रहित (संसारशरीरभोग-निर्विण्ण:) नेहमी संसार देह आणि इंद्रियांचे विषय या विषयी विरक्त (पंचगुरुचरणशरण:) पंचपरमेष्टींना सदैव शरण जाणारा आणि (तत्त्वपथगृह्य:) जीवादिक सर्वज्ञभाषित-तत्त्वांचे-सत्यार्थ श्राध्दान करणारा पहिला (दर्शनिक:) दर्शनप्रतिमाधारी श्रावक होय.

भावार्थ - स्याव्दादरूप परमागमाच्या प्रसादाने व निश्चय व्यवहाररूप दोन्ही नयांच्या अवलंबनाने निर्णयपूर्वक स्वतत्त्व परतत्त्वाला जाणून पक्के श्रध्दान करणारा, जातिकुलादिकंचा गर्व सोडून निरभिमनी बनलेला, आपणाहून गुणवान असतील त्यांचे गुण पाहून त्यापुढे आपणाला तुच्छ लेखणारा, अप्रत्याख्यानावरण कर्माच्या उदयामुळे विषयावरीलप्रीती कमी होत नसली व गृहकुटुंबातील सर्व पापक्रिया घडत असल्य तरी ते सर्व मोहकर्माच्य उदयामुळे घडून येत आहे असे जाणून सदैव ((हा माझा सर्व अज्ञानभाव केव्हा नाहीसा होईल, मी यापासू केव्हा सुटेन, जबरदस्त कर्माच्या उदयने गाठल्यामुळे मला समजत असूनही त्याग करणे घडत नाही(( असे चिंतन करून पश्चात्ताप करणारा, धर्मवान पुरषाचे गुण ग्रहण करणारा, रत्नत्रय धारम करणाऱ्या पुरुषांचा सन्मान व धर्मात्मा पुरुषाला पाहून हर्षाने रोमांचित होमारा. जो असेल तो खरा समयग्दृष्टी श्रावक म्हणावा.

विशेषार्थ - राग द्वेष, मोह आणि शरीर य सर्वशी आपलया ज्ञायक स्वभावरूप आत्मयाचे तादाम्य झालेले नसून परम पवित्र आत्माहून रागद्वेषादि विकार अत्यंत भिन्न आहेत असे अनुभवणे, जीवाशी दृढ संयोग-संबंधाने राहात असलेलया शरीराला वस्त्राप्रमाणे भिन्न मानणे, अठरा दोषरहित सर्वज्ञ वीतराग परमेष्टीलाच यथार्थ देव मानून त्या ठायी पूज्यपणा ठेणे, इतर दोषयुक्त देवामध्य देवत्वबुद्धी न ठेवणे, दया हाच श्रेष्ट धर्म मानू हिंसेमध्ये कालत्रयी धर्म घडणार नाही असा मनाचा निश्चय ठेवणे, आरंभ व परिग्रह जयांना नाहीत तेच गुरु, तयाशिवाय इतर गुरु नव्हेत असे दृढ श्रध्दान करणे, जावाला कोणी मारणारा किंवा तारणारा नसून, सुखदु:ख, उपकार, अपकार, गरीब, श्रीमत उत्पन्न करणारे जाणून

कर्मबंध बांधून घेतो व परिपाककाल कर्म उदयाला आले असता आपण सुखी व दु:खी झालो असे मानतो, याप्रमामे कर्मोदयानुसार सुख:धुख भोगणे प्राप्त आहे हे जाणून त्याविषयी माध्यस्थ्यभाव ठेवणारा समयग्दृष्टी जाणावा. व्यंतर देवांची अतिशय भक्‍ तने आराधना करणारे व मत्रतंत्रयंत्रादिकांवर विश्वास ठेवमारे जर पुण्यहीन असले तर त्यापासून त्यांचा काहीही उपकार होत नाही. पुण्य नाहीसे झाले महणजे सर्व आप्तबांधव, इष्टमित्र वगैरे शू होतात. पुण्याचा उदय असला तर मातीचे सोने होते व दगडाच्य आकाराचा देव प्रत्यक्ष ा खरे रू प धारण करू न त्वर उपकार करण्यास तयार होतो. ज्या जीवाचे ज्य ठिकाणी, ज्यावेळी, ज्या निमिततांनी जन्म वा मरण, लाभ व अलाभ, सुखदु:ख होणार असे जिनेंद्र भगवंतांनी आपल्या दिव्ज्ञानात जाणलेल असते, त्या जीवांचे, त्याठिकाणी, त्यवेळी तन्निमिततने जन्म मरण व लाभालाभादिक नियमपूर्वक होणार ते टाळण्याचे इंद्र-धरणेंद्र, क्षेत्रपाल अथवा खुद्द जिनेंद्रामध्ये देखील सामर्थ्य नाही, अशी समयग्दृष्टी खात्री असते. याप्रमाणे द्रव्याचे सर्व पर्याय जाणून श्रध्दान करणारा पहिल्ा प्रतिमेचा धारक दर्शनिक श्रावक म्हणावा.

### व्रत प्रतिमा

निरतिक्रमणमणुव्रतपंचकमपि शीलसप्तकं चापि ।

धारयते नि:शल्यो यो(सौ व्रतिां मतोव्रतिक: ।। १३८ ।।

अन्वयार्थ - (त्रिसंध्यं) सकाळी, दोन प्रहरी व सायंकाळी (त्रियोगशुध्द:) मनवचनकाया शुध्द करू न (यथाजात:) बाह्याभ्यंतर परिग्रह सोडून दोन्ही हात जोडून (चतुरावर्तत्रितय:) तीन वेळा चारही दिशांना (स्थित:) उभे राहून (चतु:प्रणाम:) चार नमस्कार करणे व (द्विनिषद्य:) दोन वेळा (प्रारंभी व शेवटी) बसून (अभिवन्दी) नमस्कार करणारा (सामयिक:) तिसरी सामायिक प्रतिमा जाणावी. याच विशेष विधी गुरुपरिपाटी जाणणाऱ्या अधिक ज्ञानी पुरुषाजवळून समजून घ्यावा.

### प्रोषधोपवास प्रतिमा

पर्वदिनेषु चतुर्ष्वपि मासे मासे स्वशक्‍ तमनिगुह्य ।

प्रोषधनियमनिवधायी प्रणधिपर: प्रोषधानशन: ।। १४० ।।

अन्वयार्थ - (मासे मासे चतुर्षु अपि पर्वदिनेषु) एका महिन्याच्या दोन अष्टमी व दोन चतुर्दशी अशा चार पर्वतीथी असतात. त्यादिवशी (स्वशक्‍ तं अनिगुह्य) आपली शक्‍ ती न लपविता (प्रोषधनियमिवधायी) आहारपानाचा तयाग करावा अथवा नीरस आहार ग्रहण करावा अथवा अल्पाहार व कांजी ग्रहण करू न (प्रणधिपर:) शुभध्यानात मन लावावे. (प्रोषधानशन:) या (विधीला( प्रोषधोपवास नामक चवथी प्रतिमा म्हणतात.

### सचित्तत्याग प्रतिमा

मूलफलशाकशाखाकरीकंदप्रसूनबीजानि ।

नामानि यो(पि सो(यं सचित्तविरतो दयामूर्ति: ।। १४१ ।।

अन्वयार्थ - (य: दयामूर्ति:) जो दयाळू गृहस्थ (मूलफलशाकशाखाकरीर-कंद-प्रसून-बीजानि) मूळ, फल, भाजी, डहाळी, उसाच्या किंवा वेळूच्या गांठी, कंद फूल आणि बी ही (अमानि) अपक्व व न पिकलेली अथवा न शिजलेली (न अत्ति) खात नाही (स: अयं) तो (सचित्तविरत:) सचित्तत्याग प्रतिमाधारी श्रावक म्हणावा.

रात्रिभोजनत्याग प्रतिमा

अन्नं पानं खाद्यं लेह्यं नाश्नाति यो विभावर्या ।

स च रात्रिभुक्तिविरत: सत्त्वेष्वनुकम्पमानमा: ।। १४२ ।।

अन्वयार्थ - (य:) जो (सत्वेषु अनुकम्पमानमना:) प्राणिमात्रावर दया करणारा (विभावर्या) रात्री (अन्न पानं खाद्यं लेह्यं) अन्न, पाणी, फराळ व पानसुपारी अशा चार प्रकारच्या आहारापैक (न अश्नाति) काहीही खात नाही, (स च रात्रिभुक्तिविरत:) तो रात्रिंभुक्तित्याग नांवाच्या सहाव्या प्रतिमेचा धारक श्रावक होतो.

## ब्रह्मचर्य प्रतिमा

मलबीजं मलयोनिं गलन्मलं पूतिगन्धिबीभत्सम्।

पश्यन्नंगमनंगाद्विरमति यो ब्रह्मचारी स:।।१४३।।

अन्वयार्थ-(य:) जो पुरुष (अंगं) आपले सरीर, (मलबीजं) रक्त आणि वीर्य अशा घाणेरड्या पदार्थापासून उत्पन्न झालेले, (मलयोनिं) मलिनतेचे कारण, (गलन्मलं) मलप्रवाही आणि (पूतिगन्धिबीभत्सं) दुर्गंध व किळस उत्पन्न करणारे आहे. (पश्यत) असे पाहून (अनंगात्) कामविकाराचा (विरमति) त्याग करतो, (स:ब्रह्मचारी) तो ब्रह्मचर्य प्रतिमाधारी श्रावक म्हणावा.

विशेषार्थ - ब्रह्मचीर पुरुषाने आपल्या विवाहित स्त्रीचा देखील उपभोग घेता कामा नये. तिच्याशी एकत्र शयन करू नये. पूर्वी जे भोग भोगले असतील त्यांचे स्मरण करू नये. कामोद्दीपन करणारा पौष्टिक आहार घेऊ नये. राग (मोह) उत्पन्न करणारी वस्त्रप्रावरणे व अलंकार अंगावर घालू नयेत, नाच, रंग, वाद्ये अवलोकन व श्रवण करू नये. फुलांच्या माळा, सुगंधी उट्या व अत्तरे ही अंगाला लावू नयेत. शृंगाराच्या कथा, अश्लील वाङ्मय, काव्ये, नाटके यांचे वाचन व श्रवण करू नये. पानसुपारी वगैरे पदार्थ विषयवासना वाढविणारे आहेत ते भक्षण करू नयेत. याप्रमाणे आचरण करणाऱ्याला वरील सातवी ब्रह्मचर्यव्रत प्रतिमा घडते.

## आरंभत्याग प्रतिमा

सेवाकृषिवाणिज्यप्रमुखादारम्भतो व्युपारमति।

प्राणातिपातहेतोर्यो(सावारम्भविनिवृत्त:।।१४४।।

अन्वयार्थ-(प्राणातिपातहेतो:) हिंसेचे कारण अशा (सेवाकृषिवाणिज्य-प्रमुखात्) शेतकी, व्यापार, नोकरी, वगैरे (आरंभत:) आरंभाचा (य:) जो (व्युपारमति) त्याग करतो (असौ) तो (आरंभिनिवृत्त:) आरंभत्याग प्रतिमाधारी श्रावक जाणावा.

भावार्थ- द्रव्य उपार्र्जन करण्याची कारणे म्हणजे व्यापार, नोकरी, सेतकी वगैरे आहेत. त्यात पाप अवश्य घडावयाचेच. ती सर्व आरंभक्रिया सोडावी. आपले द्रव्य, स्त्री, पुत्र, मित्रादिकांना विभागून द्यावे. थोडेसे आपल्याजवळ ठेवून नवीन उपार्जन करू नये. आपल्याजवळ ठेवलेल्या थोड्याशा द्रव्यातून दु:खित, बुभुक्षित कोणी असेल तर त्यावर उपकार करण्याकरिता ते द्यावे अथवा आपल्या शरीरात काही

रोग उत्पन्न झाला तर तो योग्य औषधांनी बरा करण्याकरिता खर्चावे. आपणाला लागणारी वस्त्रप्रावरणे त्यातूनच घ्यावी. आपल्यासारखेच दुसरे कोणी दु:खी असतील अथवा आपल्या प्रीतीचे असतील तर त्यांचे दु:ख निवारण करावे. इतर पापक्रियेमध्ये आपल्या द्रव्याचा उपयोग करू नये. आपण मर्यादा करून टेवलेले थोडे द्रव्य चोराने लुटून नेले अथवा एखाद्या दुष्ट राजाने हरण केले, तर त्याबद्दल शोक करू नये व ते पुन: मिळविण्याचा प्रयत्न पण करू नये. ((गेले ते गेले, कधी तरी त्याचा मला त्याग करावयाचाच होता. मोहाने थोडासा परिग्रह ठेवला होता. तो कर्माने नाहीसा करून माझ्यावर मोठा उपकारच केला. आता रागद्वेष आरंभ ऋण, भय वगैरे सर्वक लेशापासून मुक्त झालो हा मोठा सुदिन म्हणावयाचा. आजपासून द्रव्यासंबंधी दुर्ध्यान करावयाचे सुटले(( असे उच्च विचार मनात आणून सांत व्हावे. अशा प्रकारचे विचार मनात ठेवून वागणाऱ्याला आठवी आरंभत्याग प्रतिमा घते.

परिग्रहत्याग प्रतिमा

बाह्येषु दशसु वस्तुषु ममत्वमुत्सृज्य निर्ममत्वरत:।

स्वस्थ: संतोषपर: परिचित्तपरिग्रहाद्विरत:।।१४५।।

अन्वयार्थ- (बह्येषु दशसु वस्तुषु) बाह्य दहा प्रकारच्या परिग्रहावरील (ममत्वं) ममत्व (उत्सृज्य) सोडून जगात आपले कोणीही नाही असे परिणाम ठेवावे. (निर्ममत्वरत:) शरीरादिक सर्व पदार्थावरील मोह सोडून (स्वस्थ:) अविनाशी ज्ञायकस्वरूपाचा विचार करण्यात स्थिर व्हावे. भोजन, व्यसन, स्थान वगैरे आपल्या कर्मानुसार प्राप्त होईल तेवढ्या (संोषपर:) संतोष मानून अधिक मिळावे म्हणून इच्छा न करता दैन्याचा त्याग करून राहावे आणि (परिचित्तपरिग्रहात् विरत:) जेवढ्या परिग्रहांचा आपण सध्या उपभोग घेत आहोत त्यात देखील आसक्ती न ठेवता विरक्ती धारण करावी. याप्रमाणे राहण्याला परिग्रहत्याग नांवाची नववी प्रतिमा घडते.

भावार्थ- नवव्या प्रतिमाधारी श्रावकाने रुपये, मोहरा, सोने, रुपे, अलंकार, वस्त्राभरणे वगैरे सर्व वस्तूंचा त्याग करावा. थंडीची किंवा उन्हाची वेदना नाहीसी करण्याकरिता हलक्या किंमतीचे मर्यादित प्रमाणाचे वस्त्र ठेवावे. हातपाय धुण्याकरिता अथवा पाणी पिण्याकरिता लागणारे एखादे पात्र एवढाच काय तो त्याने परिग्रह ठेवावा. अशा प्रकारच्या वृत्तीला परिग्रहत्याग प्रतिमा म्हणतात. याशिवाय घरात अथवा दुसऱ्या एखाद्या एकान्त जागी शयन करणे, बसणे, उठणे, भोजन-वस्त्र घरच्या माणसांनी आणून दिले तर ग्रहण करणे, औषध आहारपान, वस्त्र घेण्याची इच्छा झाल्यास अथवा आपले अंग दुखत असल्यास त्याचे वैयावृत्य करविण्याची इच्छा झाल्यास आपल्या स्त्रीपुत्रादिकांना सांगून त्यांनी त्याप्रमाणे केले ठीक, न केले तरी त्याबद्दल मनात विकार उत्पन्न होऊ न देणे व (हे माझे घर आहे, हे सर्व धन मी संपादन करून तुमच्या हवाली केले आहे असे असून तुम्ही माझी आज्ञा मानीत नाही ना(( वगैरे शब्दांनी त्यांना दुखवून आपल्या परिणामातक लेश उत्पन्न करून घेऊ नये. अशा वृत्तीने राहणाऱ्या गृहस्थाचा या प्रतिमेत समावेश होतो.

## अनुमतित्याग प्रतिमा

अनुमतिरारम्भे वा परिग्रह वैहिकेषु कर्मसु वा।

नास्ति खलु यस्य समधीरनुमतिविरत: स मन्तव्य:।।१४६।।

अन्वयार्थ-(आरम्भे) आरंभ म्हणजे सेतकी, व्यापार वगैरे क्रिया, (परिग्रहे) परिग्रह म्हणजे धनधान्यादिक, (वा) आणि (ऐहिकेषु कर्मसु वा) ऐहिक कार्ये म्हणजे लग्नकार्यादिक क्रिया याविषयी (यस्य अनुमति: नास्ति) जो संमती देत नाही (समाधी:) जो समताबुद्धी धारण करतो (स: अनुमतिविरत: मन्तव्य:) त्याला अनुमतित्याग प्रतिमाधारी श्रावक म्हणतात.

## ग्रन्थकर्त्याची अन्तिम प्रार्थना

सुखयतु सुखभूमिः कामिनं कामिनीव। सुतमिव जननी मां शुद्धशीला भुनक्तु।

कुलमिव गुणभूषा कन्यका संपुनीताज्जिनपतिपदपद्मप्रेक्षिणी दृष्टिलक्ष्मीः ।।१५०।।

अन्वयार्थ - (जिनपतिपदपद्मप्रेक्षिणी) जिनेन्द्र भगवंताच्या चरणकमलाला अवलोकन करणारी (दृष्टिलक्ष्मीः) सम्यग्दर्शनरूपी लक्ष्मी ही (कामिनं) कामी पुरुषाला (सुखभूमिः कामिनी इव) सुखाची खाण अशी स्त्री जशी सुख देते, (सुखयतु) तद्वत् मला सुख देवो अथवा (शुद्धशला) शुद्ध मनाची (जननी) आई (सुतं इव) आपल्या मुलाचे जसे पालन करते तसे ती (मां भुनक्तु) माझे पालन करो, अथवा (गुणभूषा कन्यका) शील हाच अलंकार धारण करणारी कन्या (कुलं इव) आपल्या कुलाला जशी पवित्र करते, तद्वत ही लक्ष्मी माझ्या अन्तःकरणाला (संपुनीतात्) पवित्र करो.

भावार्थ - जसे कामवेदनेने व्याकुळ झालेल्या पुरुषाला स्त्री सुखी करते, अथवा शुद्ध स्वभावी आई आपल्या पुत्राचे पान करते, अथवा शीलवती कन्या आपल्या कुलाला पवित्र करते तद्वत शुद्ध आत्मस्वभावाला अवलोकन करणारी सम्यग्दर्शनरूपी लक्ष्मी ही माझ्या मिथ्याज्ञानजनित संतापाला दूर करून माझ्या अनंतचतुष्ट्य स्वरूपाला पुष्ट करो व रागद्वेषमोहरूपी दोषांना नाहीसे करून माझे आत्मस्वरूप निर्मल करो.

याप्रमाणे श्रीसमन्तभद्राचार्य-विरचित रत्नकरण्ड श्रावकाचाराचे मराठी भाषांतर समाप्त झाले.

सोलापूर.
चैत्र वद्य १० वि. सं. १९६९
वीर. सं. २४३९

अनुवादक
जीवराज गौतमचंद दोशी

`